# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०५ डिसेंबर, २०१६ / अग्रहायण १४, १९३८ ( शके )**

(१) महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री
(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री
(३) कृषी आणि फलोत्पादन मंत्री
(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री
(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री

} यांचे प्रभारी विभाग

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८७**

---

### राज्यातील मध्यम व मोठ्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याबाबत

(१) * ६५२०४ श्री.भास्कर जाधव (गुहागर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील

**(कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संजय कदम (दापोली), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.धैर्यशील पाटील (पेण), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गावरील महाड (जि.रायगड) येथील सावित्री नदीवरील पूल कोसळून ४० हून अधिक व्यक्ती,प्रवासी व कर्मचारी मृत्यू झाल्याची घटना दिनांक २ ऑगस्ट, २०१६ च्या मध्यरात्री घडली असून सदर पुल वाहतुकीसाठी धोकादायक असतानाही स्ट्रक्चरल ऑडीटमध्ये सुस्थितीत असल्याचे दर्शविण्यात आले होते परंतु पुलांची रचना तपासणी (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्यासाठी आवश्यक असणारे राज्यातील एकमेव निरिक्षण यंत्र रत्नागिरी येथे बंद अवस्थेत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अलिबाग, मुरूड व रोहा (जि.रायगड) तालुक्यातील अनेक रस्ते, पूल व साकव हे जुलै ते सप्टेंबर, २०१६ मध्ये पडलेल्या अतिवृष्टीमुळे नादुरूस्त होऊन खचले गेल्याने वाहतूकीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत असल्याने तेथील ग्रामस्थांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग तसेच राज्य शासनाकडे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, कोकणातील रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयातील सुमारे ८० ते ८५ वर्षांपूर्वी बांधलेल्या १७ ब्रिटीशकालीन पुलांचे आयुर्मान संपले असूनही अद्यापही सदर पुलांवरून वाहतूक सुरु असल्याची गंभीर बाब माहे ऑक्टोबर, २०१६ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग १ मधील घटनेची उच्च न्यायालयाच्या निवृत न्यायाधीशांमार्फत चौकशी करण्याचे व राज्यातील मध्यम व मोठ्या अशा सुमारे २२०० पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचे काम राज्य शासनाने सुरु केले असून वर्षातून दोन वेळा जुन्या पुलांचे सर्वेक्षण करणे, सर्वेक्षणाची माहिती संकेतस्थळावर टाकणे सार्वजनिक बांधकाम विभागाला बंधनकारक केले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने माहे नोव्हेंबर, २०१६ पर्यंत राज्यातील किती पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट केले असून किती पूल धोकादायक आढळून आले आहेत, धोकादायक पुलांचे मजबूतीकरण किंवा नवीन पूल बांधण्यासाठी व प्रश्न भाग २ व ३ मधील पुलांच्या व रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम व यंत्राची तातडीने दुरुस्ती करुन ते कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) तसेच, महाड प्रकरणातील पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट सुस्थितीत दर्शविणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली, तसेच मृत व्यक्ती, प्रवासी व कर्मचारी यांच्या कुटुंबाला नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.
२४ मे ते २३ जून, २०१६ याकालावधीमध्ये पूल पाहणी संयंत्राच्या सहाय्याने रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील एकूण २३ मोठ्या पुलांची सर्वकष पाहणी पूर्ण करण्यात आली. त्यानंतर पावसामुळे पुलांच्या पाहणीचे काम स्थगित करुन संयंत्र रत्नागिरी येथील विश्रामगृहाचे आवारात ठेवण्यात आले होते. त्यानंतर जुलै, २०१६ अखेर सदरील यंत्र नादुरुस्त झाल्याचे निदर्शनास आले. दि.१८/९/२०१६ रोजी सदरील यंत्र पुर्ववत करण्यात आले असून पूल पाहणीसाठी उपयोगात आणण्यात येत आहे.
(२) होय.
(३) मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये १७ मोठ्या पुलांपैकी १४ पूल ब्रिटीशकालीन आहेत. १७ पुलांपैकी १० पुलांना पर्यायी चौपदरी पुलाचे बांधकाम प्रगतीत असून ३ पुलांना पर्यायी पुलांच्या बांधकामासाठी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. उर्वरीत ४ पुलांना पर्यायी पुल बांधण्यासाठी निविदा प्रक्रीया प्रगतीत आहे.

(४) सावित्री नदीवरील पुल पडण्याच्या दुर्घटनेची उच्च न्यायालयाच्या निवृत न्यायधीशांमार्फत चौकशी करण्याचा शासन निर्णय दि. १ आक्टोबर, २०१६ रोजी निर्गमित केला आहे.

राज्यातील पुलांचे आवश्यकतेनुसार स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचे काम हाती घेतले आहे. तसेच प्रत्येक पुलाची पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यानंतर पाहणी करणे बंधनकारक आहे.

(५) ऑक्टोबर, २०१६ अखेर ३०६ पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट पुर्ण केले आहे. उर्वरीत पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट बाबत कार्यवाही सुरू आहे. त्यामधील निष्कर्षांनुसार पुलांची दुरूस्ती अथवा पुर्नबांधणीची कामे निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येत आहेत.

अलिबाग, मुरूड व रोहा (जि. रायगड) तालुक्यातील रस्ते, पुल व साकव यांच्या दुरूस्तीची कामे निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार करण्यात येतील.

(६) सावित्री नदीवरील पुल पडण्याच्या दुर्घटनेची उच्च न्यायालयाच्या निवृत न्यायधीशांमार्फत चौकशी करण्याचा शासन निर्णय दि. १ आक्टोबर, २०१६ रोजी निर्गमित केला आहे.

राज्य परिवहन मंडळाच्या बसमधील प्रत्येक मृत प्रवाशांच्या वारसांना रु.१४ लक्ष व तसेच खाजगी वाहनातील प्रत्येक मृत प्रवाशांच्या वारसांना रु.१० लक्ष मदत दि. १९ ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयानुसार घोषित करण्यात आली आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील ऊस पीकाचा पीक विमा योजनेमध्ये समावेश करण्याबाबत

**(२) * ६७६६६ श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयामध्ये माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे दोनवेळा नदयांना महापूर येवून पीके पाण्याखाली गेली असताना, कृषी विभागाने केलेल्या पीक हमीच्या पंचनाम्याच्या अहवालानुसार जिल्हयातील २ हजार ५० हेक्टर क्षेत्रावरील शेतीपीके व फळपिकांचे पूर्णपणे नुकसान झाले असे नोंदवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्षेत्रामध्ये सर्वाधिक ८८६ हेक्टर ९३ आर इतके क्षेत्र निव्वळ ऊस पिकाचे असल्याचे निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पीक विमा योजनेमध्ये ऊस पीकांचा समावेश करण्यात आलेला नसल्याने ऊस उत्पादकांना नुकसान भरपाईपासून वंचित रहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ऊस पीकाचा पीक विमा योजनेमध्ये समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) जुलै व ऑगस्ट २०१६ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे एकूण ५०८३.६८ हेक्टर क्षेत्रावरील शेतीपीके व फळपीकांचे नुकसान झाले असल्याचे दिसून येते तसेच २६२७.११ हेक्टर क्षेत्रावरील ऊस पिकाचे नुकसान झाले असल्याचे दिसून येते.
(३) राष्ट्रीय कृषि विमा योजनेमध्ये ऊस पीकाचा समावेश होता. परंतु, मागील ५ ते १० वर्षाची आकडेवारी पाहता ऊस पिकासाठी विमा संरक्षण घेण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. त्यामुळे खरीप २०१६ पासून राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेत ऊस पिकाचा समावेश करण्यात आलेला नाही.

तथापि, कोल्हापूर जिल्हयांमध्ये जुलै व ऑगस्ट, २०१६ मध्ये अतिवृष्टी/पुर यामुळे बाधित क्षेत्रापैकी ऊस पिकाखालील क्षेत्र २६२७.११ हेक्टर इतके असून या बाधित क्षेत्रात नैसर्गिक आपत्ती म्हणून मदतीचा प्रस्ताव महसूल व वन विभागाकडे पाठविण्यात आला आहे.
(४) राष्ट्रीय कृषि विमा योजनेमध्ये ऊस पीकाचा समावेश होता. परंतु, मागील ९ वर्षामध्ये ऊस पिकाखालील सर्वसाधारण क्षेत्र १०.०० लाख हे. असून दरवर्षी साधारणपणे ५०० हे. क्षेत्र (०.०५ टक्के) विमा संरक्षीत करण्यात येते. ऊस पिकासाठी योजनेत घेण्यात येणारा कमी सहभाग, ऊस पिक बागायती असल्याने मिळणारी अत्यल्प नुकसान भरपाई तसेच राष्ट्रीय कृषि विमा योजना कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक करणेबाबत न्यायालयाने दिलेले निर्णय या सर्व बाबींचा विचार करुन मंत्री मंडळाच्या बैठकीमध्ये तसेच मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय पीक विमा समन्वय समितीच्या बैठकीमध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजनेमधून ऊस हे पिक वगळण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे खरीप हंगाम २०१६ पासून प्रधानमंत्री पिक विमा योजनेमधून ऊस हे पिक वगळण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत

**(३) * ७१३०२ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा, पंढरपूर, माळशिरस, बार्शी, मंगळवेढा व सांगोले (जि. सोलापूर) सह सर्वच तालुक्यांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतात पाणी शिरुन खरीप पिके वाहुन गेली तसेच शेतात पाणी साचुन राहिल्यामुळे पिके पाण्याखाली जाऊन अतोनात नुकसान झाले असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच दारफळ, माढा व कुर्डवाडी (ता.माढा) या तीन मंडळामध्ये एकाच दिवसात ६५ मि.मि. पेक्षा अधिक पाऊस झाल्यामुळे तुर, सोयाबीन, उडीद या पिकांसह इतर पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक गावांमधील घरांची पडझड व इतर हानी होऊन शेतकऱ्यांचे ३ कोटी ६० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे पंचनामे करुन तसा अहवाल स्थानिक प्रशासनाकडून दिलेला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती उक्त प्रकरणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) अतिवृष्टीमुळे शेतीपिकांची नुकसान भरपाई देण्यासाठी, झालेल्या नुकसानीची आकडेवारी क्षेत्रीय कार्यालयांकडून अचूक पंचनामे करुन मागविण्यात आली आहे. सदर माहिती संकलीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्याची बाब प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उदगीर (जि.लातूर) येथील बसस्थानकाच्या नुतनीकरणाबाबत

**(४) * ७१६५७ श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथील बस आगार मागील ४० वर्षापूर्वी बांधण्यात आले असून दुरवस्था झालेल्या आगाराची जुनी इमारत धोकादायक झाल्यामुळे कर्नाटक, आंध्र प्रदेश व तेलंगणा राज्यातून येणाऱ्या लाखो पर्यटकांना तसेच प्रवाशांना व कर्मचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिंतीला तडे गेलेल्या व छतातून पाणी गळत असलेली ही धोकादायक इमारत पाडून या ठिकाणी नवीन इमारत बांधण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने ही धोकादायक इमारत पाडून या ठिकाणी नवीन इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) उदगीर येथील बसस्थानकावर उपहारगृह, जनरल स्टोअर्स, पुस्तक दुकान, फळाचे दुकान, टेलिफोन बुथ इ. वाणिज्य आस्थापना कार्यरत आहेत. तसेच सुलभ शौचालय, पिण्याचे पाणी, प्रतिक्षालय, बसण्यासाठी बाके, तिकिट आरक्षण व्यवस्था, लाईट-पंखे अशा मुलभुत सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. वाहनतळ सुस्थितीत असून प्रवाशांसाठी एकूण १४ फ्लॅटफार्म आहेत. आगाराची दैनंदिन स्वच्छता खाजगी संस्थेमार्फत करण्यात येते.

सदर बसस्थानकाबाबत लोकप्रतिनिधींकडून निवेदन प्राप्त झाले असून, सध्याच्या बसस्थानकाचे नुतनीकरण/दर्जावाढ व वाहनतळाचे डांबरीकरण करण्याच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून बसस्थानकाच्या नुतनीकरणाच्या निविदा मागविणेची कार्यवाही राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठवाड्यातील चारा छावण्यांची थकीत रक्कम देण्याबाबत**

**(५) * ६५८०० श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयात चौथ्या वर्षी दुष्काळ असून गत वर्षाच्या चारा छावण्यांचे १५० कोटी रुपये थकीत असताना यावर्षी जनावरांसाठी चारा छावण्या सुरु करण्याची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती गत वर्षाच्या चारा छावण्यांचे १५० कोटी रुपये देण्याबाबत व यावर्षी चारा छावण्या सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अशंत: खरे आहे.

मराठवाड्यातील बीड जिल्हयाच्या चारा छावण्यांकरिता रु.६४.९५ कोटीची देयके प्रलंबित आहेत.

(२) होय.

(३) मराठवाड्यातील बीड जिल्हयाच्या चारा छावण्यांकरिता थकित असलेले रु.६४.९५ कोटी इतका निधी वितरीत करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच चालू वर्षी औरंगाबाद विभागातील कोणत्याही जिल्हयाकडून चारा छावणी सुरु करण्याबाबतची मागणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे चारा छावण्या सुरु करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कर्जत-मुरबाड (ता.कर्जत, जि.रायगड) राज्य मार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(६) * ६९८९१ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत-मुरबाड (ता.कर्जत, जि.रायगड) राज्य मार्गाचे रुंदीकरणाचे काम तीन वर्षापूर्वी ठाकूर इन्फ्रा प्रोजेक्टर लि.या कंपनीने केले असून काही ठिकाणी अतिशय निकृष्ट दर्जाचे काम केल्याने रस्ता खचल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गावरील तीनही मोठे पूल जीर्ण अवस्थेत असून मोडकळीस आल्याने, या पूलांच्या जागी नवे पूल बांधण्याबाबतचा अहवाल कर्जत सार्वजनिक बांधकाम विभागाने राज्य शासनाकडे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नवे पूल बांधण्याबाबत व रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत तसेच रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्नांकीत ३ पूल सुस्थितीत आहेत. या पूलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेण्यात येत आहे. प्राप्त निष्कर्षाप्रमाणे कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बुलढाणा व वाशिम जिल्हयातील ब्रिटीशकालीन पूलांची झालेली दुरवस्था**

**(७) * ६८०७७ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील आमना नदीवरील चिखली, देऊळगांवराजा पूल, खडकपुर्णा नदीवरील चिखली, पैनगंगा नदीवरील चिखली व मेहरक पूल हे ब्रिटीशकालीन असून सर्व पूल अतिधोकादायक झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) रिसोड (जि.वाशिम) वाकद-गोहोगाव मार्गावरील खराटी नाल्यावरील जूना पूल पाण्याच्या अतिप्रवाहाने दिनांक २७ जुलै २०१६ रोजी तुटल्यामुळे वाकद तथा अन्य गावांचा संपर्क तुटला असून गोहोगाव ते बोरी या मार्गावरील पूल ही तुटल्याने शालेय विद्यार्थी आणि रुग्णांचे हाल होत आहेत, हे खरे आहे काय,
(३) मासरुळ ते तराडखेड (ता.जि.बुलढाणा) या रस्त्यावर मागील २-३ महिण्यापुर्वी नव्याने बांधण्यात आलेल्या पुलाच्या कामात मोठया प्रमाणात अनियमितता झाली असून पुलाचे काम निष्कृष्ट दर्जाचे झाल्याने पुलावर मोठे खड्डे पडल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यात विविध ठिकाणी नद्यांवर ब्रिटीशांनी २० हून अधिक पूल बांधले असून त्यांची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन प्रश्न भाग १ ते ३ मधील दुरवस्था झालेल्या पुलाची दुरुस्ती व नवीन पुल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व मासरुळ ते तराडखेड पुलाच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३अ वर खडकपूर्णा व आमना हया दोन जुन्या पुलालगत नवीन पूल बांधण्यात आलेले आहेत.
(२) अंशत: खरे आहे.

वाकद गोहोगाव हया इतर जिल्हा मार्ग क्र.२४ वरील या रस्त्याच्या कि.मी.१/१०० मधील पाइप कल्वर्ट दि.२५ जुलै, २०१६ व त्यासुमारास अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त झाला होता. तसेच गोहोगाव ते बोरी हया रस्त्यावरील कि.मी. ६/४०० मधील पाईप कल्वर्ट क्षतीग्रस्त झाली होती. त्या दोन्ही पाईप कल्वर्टची तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली असून वाहतूक सुरळीत करण्यात आल्याचे ग्रामविकास विभागाने कळविले आहे.
(३) हे खरे नाही.

(४) बुलढाणा अंतर्गत एकुण ४ ब्रिटीशकालीन पूल असून, सदयस्थितीत सदर पूल सुस्थितीत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर जिल्हयातील पूलांची व रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(८) * ६५८२९ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील कानसा नदीवरील विरळे-जांभूर पुलालगतचा रस्त्याची दुरवस्था, शाहुवाडी-करंजोशी व वारणा नदीवरील निलेवाडी-ऐतवडे या पुलांना मोठे खड्डे व संरक्षक कठड्याची दुरवस्था, हेरे पुलावरील कठडयाची दुरवस्था, नेसरी कोवाड वळण रस्त्यावर सातत्याने होत असलेले अपघात, नेसरी-डोणेवाडीकरांना घटप्रभा डोणेवाडी दरम्यान घटप्रभा नदीवरील पुल वाहतुकीच्या दृष्टीने धोकादायक अवस्थेत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) गडहिंग्लज व चंदगड या तालुक्यांना जोडणाऱ्या सांबरे-माणगाव रस्त्यांचे रूंदीकरण करण्याची मागणी गडहिंग्लज व चंदनगडचे लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री व जिल्हाधिकारी यांचेकडे सातत्याने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कोल्हापूर-रत्नागिरी या अत्यंत महत्वाच्या महामार्गावरील वारूळ येथील १२५ वर्षे जुन्या एस आकाराच्या पुलाच्या संरक्षक कठड्याची दुरवस्था झाली असून वाहतुकीच्या दृष्टीने धोकादायक बनत चालला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ११ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट (नियतकालिक परिक्षण) माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आले असून त्याचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन जिल्ह्यातील नवीन पूल बांधण्याबाबत व रस्ते दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे. हेरे पुलाचे रेलींग क्षतिग्रस्त झाले आहे. कोवाड वळण रस्त्यावर सातत्याने अपघात घडत असल्याची नोंद पोलीस दप्तरी नाही. घटप्रभा नदीवरील पुल सुस्थितीत आहे.

(२) निवेदन प्राप्त नाही.

(३) नाही हे खरे नाही.

(४) नाही. ८ पूलांचे ऑडीट पूर्ण करण्यात आले असून ५ पूलांचे ऑडीट करण्याचे काम प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषी सेवकांच्या परीक्षामध्ये झालेला गैरव्यवहार

**(९) * ६५५०४ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी आयुक्तालयांतर्गत कृषी सेवकाच्या ७३० पदांसाठी दिनांक ०६ ऑगस्ट, २०१६ रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल दिनांक ७ सप्टेंबर, २०१६ रोजी लागल्यानंतर परीक्षेतील निकालात एकच विद्यार्थी दोन वेळा उत्तीर्ण होणे, माजी सैनिकासाठींच्या राखीव जागेत मुलींची निवड करणे, परीक्षार्थी दोन भावांना सारखेच गुण मिळणे, इतरमागासवर्गीय प्रवर्गात परीक्षार्थींनी पदासाठी अर्ज केलेले असताना काही उमेदवारांना खुल्या प्रवर्गासाठी वयाची अट उलटून गेलेली असतानाही त्यांना पात्र ठरविण्यात आल्याने कृषी सेवक पदांच्य भरतीत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याचे आदेश मा.कृषी मंत्री यांनी कृषी आयुक्तांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची चौकशी कृषी आयुक्तांनी पूर्ण केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार झालेल्या सेवाभरतीतील गैरव्यवहारास जबाबदार असणा-या संबंधित दोषी व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) कृषी आयुक्तालयाच्या अधिनस्त विभागीय कार्यालयांतर्गत गट-क संवर्गातील कृषि सहाय्यकांची ७३० रिक्त पदे कृषी सेवक म्हणून निश्चित वेतनावर सरळसेवेने भरण्यासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे दिनांक ६/८/२०१६ रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल दिनांक ६/९/२०१६ रोजी घोषित करण्यात आला आहे. सदर निकालाच्या अनुषंगाने तक्रारी प्राप्त झाल्यामुळे कृषी सेवक भरती प्रक्रिया सखोल चौकशी पर्यंत स्थगित करण्यात आलेली आहे. आयुक्त (कृषी) यांच्या दि.२४.१०.२०१६ च्या चौकशी अहवालाप्रमाणे त्यावर अतिरिक्त माहिती मागविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना हरभरा बियाणांचा पुरेसा पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०) * ६७५१४ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम विदर्भाच्या पाच जिल्ह्यात ९ लाख हेक्टरवर कृषी विभागाने रब्बी हंगामाचे नियोजन केले असून त्यासाठी लागणाऱ्या हरभरा या पिकांचे बियाणे उपलब्ध नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी कंपन्यांनी बियाणांचे दर वाढविल्याने शेतकऱ्यांनी यावर्षी महाबिजकडे हरभऱ्याच्या बियाणांची मागणी नोंदविली असून राज्याची गरज दोन लाख क्विंटल बियाणांची असताना महाबिजकडे केवळ १ लाख २० हजार क्विंटल बियाणे उपलब्ध असून हरभरा बियाणे खरेदी करण्यासाठी तिसऱ्यांदा निविदा काढण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती शेतकऱ्यांना हरभरा बियाणांचा पुरेसा पुरवठा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.
(२), (३) व (४) मागणीनुसार बियाणे पुरवठा करण्यासाठी महामंडळाने दोन वेळा ई टेंडर काढले होते. परंतु निविदेमधील प्राप्त दर व त्यावेळेसचे हरभरा वाणाचे बाजारभाव व बाजारभावातील चढ उतार या बाबींचा विचार करता निविदेमधील प्राप्त दरानुसार बियाणे खरेदी करणे शक्य झाले नाही. मात्र सध्या महाबीजकडे हरभरा बियाणांची रब्बी हंगामाकरीता १,९०,९२६ क्विंटल अपेक्षित बियाणे उपलब्धता असून त्यानुसार पुरवठा नियोजन करण्यात आले आहे. त्यापैकी १,७९,८९० क्विंटल बियाणे पुरवठा महामंडळामार्फत पूर्ण करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माळवाडी (ता.इगतपूरी, जि.नाशिक) येथे आदिवासी उपयोजनेतंर्गत मंजूर झालेल्या रस्त्याबाबत

**(११) * ७१७४५ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इगतपुरी (जि.नाशिक) तालुक्याच्या पूर्व भागातील राज्यमार्ग २१ ते माळवाडी (खेड) येथे आदिवासी उपयोजनेतंर्गत दोन वस्त्या जोडण्यासाठी मंजूर झालेला रस्ता ठेकेदार व अधिकारी यांनी संगनमत करुन दुसऱ्याच ठिकाणी रस्ता नेवून आदिवासी बांधवांची फसवणूक केल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी उपयोजनेतंर्गत मंजूर झालेला रस्ता माळवाडी येथे न करता रस्ता दुसऱ्या ठिकाणी नेल्याने संबंधित माळवाडी येथील आदिवासी ग्रामस्थांनी तहसिलदार, इगतपुरी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नाशिक, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक, उप अभियंता, पंचायत समिती, इगतपुरी व जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ठेकेदार व अधिकारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) असे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयात प्राप्त नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर विभागात निकृष्ट दर्जाच्या निविष्ठाचे शेतकऱ्यांना वाटप केल्याबाबत**

**(१२) * ६९५७० श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर विभागात शेतकऱ्यांना अनुदानावर निविष्ठा (बियाणे, जैविक व रासायनिक खते आणि कीटकनाशके) वाटप करण्यासाठी कोट्यवधी रुपयांची खरेदी महाराष्ट्र कृषी विकास महामंडळ व कृषी विभाग यांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र कृषी विकास महामंडळ व कृषी विभागाने सन २०१५-१६ ह्या वर्षात ज्या कंपन्याकडून निविष्ठा खरेदी केलेली होती त्याच कंपनीमार्फत सन २०१६-१७ मध्येसुद्धा खरेदी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खरेदी केलेली निविष्ठा शेतकऱ्यांना वाटप करताना त्यामध्ये गैरप्रकार झाला असून शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेली निविष्ठा अत्यंत निकृष्ट दर्जाची होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) कृषी विभागाच्या विविध योजनांतर्गत बियाण्यांकरिता 'महाबीज, राष्ट्रीय बीज निगम व हिंदुस्थान ईन्सेक्टीसाईड लि. यांची आणि अन्य निविष्ठांच्या (जैविक व रासायनिक खते व कीटकनाशकांसह) पुरवठयासाठी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाची राज्य शासनाने

पुरवठादार संस्था म्हणून नेमणूक केली आहे. नागपूर विभागाकरिता विविध योजनांतर्गत प्राप्त लक्षांकाच्या मर्यादेत सदर पुरवठादार संस्थांकडून निविष्ठांची खरेदी करण्यात आली आहे. सदर पुरवठादार संस्थांनी शासनाने विहीत केलेल्या खरेदी प्रक्रियेचा अवलंब करुन निविष्ठांचा पुरवठा केलेला आहे तसेच, सदर खरेदी प्रक्रियेमध्ये सर्वांना सहभागी होण्याची संधी देण्यात आली होती.

(३) हे खरे नाही. विविध योजनेंतर्गत पुरवठा करण्यात आलेल्या निविष्ठाचे नमुने काढुन ते तपासणीसाठी पाठवुन नमुने प्रमाणित असल्यास देयकांची अदायगी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दहिसर (पूर्व), मुंबई येथील केतकीपाडा व चेकनाका बसस्थानकांजवळ अनधिकृत रेती साठा केल्याबाबत**

**(१३) * ७१६०५ श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिसर-पूर्व, मुंबई येथील के.एन.शेख क्वॉरी (खदान) केतकीपाडा व चेकनाका बसस्थानकांजवळ अनेक रेती व्यवसायीकांनी केलेला अनधिकृत रेती साठा व वाहन क्षमतेपेक्षा जास्त भाराचा रेती माल वाहून नेणाऱ्या गाडयांवर कारवाई करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास तहसिलदार कार्यालय, बोरीवली यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त खदान मालकांवर व रेती साठा करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) व (३) तहसिलदार बोरीवली यांच्या अधिनस्थ पथकाने मौजे दहिसर, ता. बोरीवली येथील सर्वे नं ९५, ९७, ९८, ९९ व १०० या ठिकाणी दिनांक २०.०७.२०१६ रोजी भेट दिली असता, तेथे विनापरवानगी ३४८ ब्रास रेतीसाठा केल्याचे निदर्शनास

आले. त्यानुसार तहसिलदार बोरीवली यांच्याकडून संबंधितांविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४८ अन्वये, दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, दंडाच्या रकमेच्या वसूलीच्या अनुषंगाने संबंधितांच्या मिळकतीच्या अधिकार अभिलेखावर बोजा चढविण्याच्या सूचना तहसिलदार बोरीवली यांनी तलाठी सजा दहिसर यांना दिल्या आहेत.

तसेच, मुंबई उपनगर जिल्ह्यात रेतीच्या अवैध वाहतुक व वहनक्षमतेपेक्षा जास्त भाराच्या लोडिंग वाहतुकीच्या प्रकरणात वेळोवेळी कारवाई करुन, संबंधितांकडून रुपये ५,८७,४५५/- एवढी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कणकवली-आचरा (जि.सिंधुदुर्ग) या राज्य महामार्गाची झालेली दुरवस्था

**(१४) * ६५३२४ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली-आचरा (जि.सिंधुदुर्ग) या सुमारे ३२ कि.मी. अंतराच्या राज्य महामार्गाची अत्यंत दुरवस्था झाली असून संपूर्ण रस्ताला खड्डे पडले असून या रस्त्यांवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्रास होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठया प्रमाणात अपघात होत असल्याने सदरहू रस्त्याचे तातडीने दुरुस्ती करण्यात यावी म्हणून तेथील ग्रामस्थांनी मागील दोन वर्षापासून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कणकवली, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, रत्नागिरी, मा.पालकमंत्री, सिंधुदूर्ग जिल्हा, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री आदींकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली असतानाही सदरहू रस्त्याच्या दुरूस्तीच्या कामाकडे शासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाचे चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदरहू रस्त्याच्या मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा दोन वर्षापासून याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नांकित रस्ता रा.मा. १८१ असून कणकवली-आचरा या दरम्यानची लांबी ३६.८०० कि.मी. आहे. या लांबीपैकी ७.८ कि.मी. लांबीच्या रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग काही प्रमाणात क्षतिग्रस्त झाला आहे.

(२) हे खरे नाही.

रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे जांभ्या दगड खडीने भरण्यात आले आहेत. रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रित खडीने भरण्याचे काम प्रगतीत आहे. रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) रस्त्याच्या क्षतिग्रस्त लांबीतील मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम व अन्य आवश्यक कामे शासनाच्या विविध योजनातंर्गत मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

----------------

## अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना निकृष्ट दर्जाचे सोयाबीन बियाणे महाबीजतर्फे पुरविण्यात आल्याबाबत

**(१५) * ६५७६४ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर, राहता, राहुरी (जि.अहमदनगर) या तालुक्यातील शेतकऱ्यांना जे.एस. ९३०५ या वाणाचे निकृष्ट दर्जाचे बियाणे महाबीज संस्थेकडून पुरविण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रार निवारण समितीने बियाणे कायदयानुसार फौजदारी कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निकृष्ट बियाणे पुरविणाऱ्या कंपनीविरूदध कारवाई करण्याबाबत तसेच बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादीत, अकोला यांचे मार्फत खरीप २०१६ हंगामात अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर, राहता व राहुरी या तालुक्यांत

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांनी उत्पादीत केलेले व बियाणे कायद्यानुसार बीज प्रमाणिकरणाचे किमान मानकानुसार पात्र असलेले सोयाबीन जे.एस.९३०५ या वाणाची पायाभुत दर्जाचे बियाणे बिजोत्पादन कार्यक्रमांतर्गत एकूण ७७ बिजोत्पादकांना वाटप करण्यात आले होते. त्यापैकी ३७ बिजोत्पादकांनी बियाणांची उगवण कमी झाल्याच्या तक्रारी महामंडळाकडे केल्या होत्या. सर्व तक्रारग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतांना भेटी देऊन नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करण्यात आलेली आहे. तसेच या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळास कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. यासंदर्भात महाबीज बियाणे महामंडळाने ९ बिजोत्पादकांना दुसऱ्या लॉटचे प्रमाणित -१ दर्जाचे बियाणे बिजोत्पादन क्षेत्रात त्वरीत पुन:पेरणी करता उपलब्ध करून दिलेले आहे. तसेच उर्वरित बिजोत्पादकांना पायाभुत बियाणे मात्रेची किंमत रूपये २,१६,२४०/- देण्याचा निर्णय घेतला आहे. राहुरी तालुक्यातून या संदर्भात तक्रार प्राप्त नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अहमदनगर जिल्हयात अतिवृष्टी व नद्यांना आलेल्या पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(१६) * ६६८४३ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील सुमारे २२० तर नेवासा तालुक्यातील १५ गावांमध्ये अतिवृष्टी व नद्यांना आलेल्या पुरामुळे जिल्हयात सुमारे १५ हजार हेक्टर तर नेवासा तालुक्यात १७०० हेक्टर शेतांचे १००% नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) अतिवृष्टीमुळे शेतीपिकांची नुकसानभरपाई देण्यासाठी, झालेल्या नुकसानीची आकडेवारी क्षेत्रीय कार्यालयांकडून अचूक पंचनामे करुन मागविण्यात

आली आहे. सदर माहिती संकलीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. यासंदर्भात प्राप्त होणा-या माहितीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्याची बाब प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ९१ प्रकारच्या सामग्रीवर मुद्रांक शुल्क वसुलीबाबत

**(१७) * ६७७२४ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कापूस खरेदी, कच्चे सूल, तेलबीया, डाळी, शेअर खरेदी व विक्री, धातू आदी ९१ प्रकारच्या सामग्रीवर मुद्रांक शुल्क वसूल करण्याची नियमावली असताना सन २००७ पासून हे शुल्क वसूल करण्यात आले नसल्याने मुद्रांक शुल्काचे कोट्यवधी रुपये थकीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने थकीत असलेले मुद्रांक शुल्क वसूल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मनोर-वाडा-भिंवडी (जि.ठाणे) रस्त्याचे ठेकेदार यांनी गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची रक्कम शासनाला दिली नसल्याबाबत

**(१८) * ६९७१६ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर-वाडा-भिंवडी (जि.ठाणे) रस्त्याचे ठेकेदार सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर यांनी माती, खडी व रेती या खनिजाची ७ लाख ५० हजार ब्रास गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची

सुमारे २९ कोटी इतकी रक्कम शासनाला न देता त्याचा अपहार केल्याबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने कोकण विभागीय आयुक्त यांनी उपायुक्तांमार्फत चौकशी करण्याचे आदेश दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उपायुक्तांनी कोकण आयुक्तांना सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रमुख बाबी कोणत्या, तसेच संबंधीत कंपनी व ठेकेदारांकडून पाचपटीच्या दंडासह गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची २९ कोटी इतकी रक्कम वसुल करावी अशा आदेशाचे पत्र विभागीय आयुक्तांकडून पालघर व ठाणे जिल्हाधिकारी यांना माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर व ठाणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांनी विभागीय आयुक्तांच्या आदेशानुसार संबंधीत कंपनीकडून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत व संबंधीत कंपनीविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मनोर-वाडा-भिवंडी या रस्त्याच्या कामासाठी गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची चोरी झाल्यासंबंधी शासनास प्राप्त झालेल्या विविध निवेदनांच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कोकण विभाग यांना त्यांच्या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत सखोल चौकशी करुन कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी सदर प्रकरणाची उप आयुक्त (रोहयो) यांच्यामार्फत केलेल्या चौकशीत एकूण ७,५०,००८ ब्रास गौण खनिजाचे स्वामित्वधन शासनजमा केले नसल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार विभागीय आयुक्त कोकण विभाग यांनी दिनांक १८/०७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी ठाणे व जिल्हाधिकारी पालघर यांना पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

त्यानुसार तहसिलदार पालघर व वाडा यांनी दंडाचे आदेश पारीत केले असून, तहसिलदार भिवंडी यांनी देखील संबंधीतांना अवैध उत्खननाबाबत दंडात्मक कारवाईची नोटिस बजावली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील होडीसेवा बंद केल्याबाबत

**(१९) * ६६१०९ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील काही खाडयांना व नद्यांना पूल अथवा ये - जा करण्याकरीता अन्य कोणताही मार्ग नसल्यामुळे तेथील ग्रामस्थ, विद्यार्थी व रूग्ण हे होडीने प्रवास करित असून कोकण किनारपट्टीतील मेरिटाईम बोर्डाने ज्या गावांमध्ये सुरु केलेली होडीसेवा माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्हयातील आरोसबाग वाडीत सुमारे ८४० कुटुंबे असून, गावातून दररोज सुमारे १५० विद्यार्थी शाळा व कॉलेजला जाण्यासाठी पर्यायी मार्ग नसल्यामुळे होडीतून प्रवास करतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील बांदा-आरोसबाग, शेर्ले-बांदा, नाईबाग, शिरवळ-हडपीड, बेळणे-बावशी, तोंडावळी-पियाळी या गावांना मुलभूत गरजेसाठी पर्यायी मार्ग नसल्याने होडीनेच प्रवास करावा लागत असून ही गावे पूलापासून वंचित असून तेथील ग्रामस्थ ४० वर्षापासून पूल बांधण्याची मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी व पाहणी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुषंगाने पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) व (2) होय

(3) बांदा-आरोसबाग, शेर्ले बांदा, नाईबाग या गावांना जोडणारा पूल नाबार्ड-21 अंतर्गत मंजूर आहे. शिरगांव, हडपीड, बेळणे बावशी, तोंडवळी पियाळी ही गावे रस्त्याने जोडली गेली आहेत. या ठिकाणी पूलाची मागणी नाही. रत्नागिरी जिल्हयातील प्रमुख जिल्हा मार्ग क्र.4 वर दाभोळ खाडीवर व जयगड खाडीवर पूलाचे बांधकाम प्रस्तावित असून सदर पूलांचे सर्वेक्षणाचे काम प्रगतीत आहे.

(4) बांदा -शेर्ले आणि बांदा- आरोसबाग दरम्यान होडीने प्रवासी वाहतुक होत होती. त्याची आकस्मिक तपासणी केली असता, प्रवाशांच्या सुरक्षितेच्या दृष्टीकोनातून इनलॅण्ड व्हेसल ॲक्ट, 1917 मधील तरतुदीप्रमाणे त्यात कोणतीही जीवरक्षक साधने आढळली नाही. त्यामुळे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत सदर ठिकाणची

प्रवासी वाहतुक बंद करण्यात आली असून संबंधितांना सुरक्षित प्रवासी वाहतुक करण्याच्या अनुषंगाने आवश्यक बाबींची पुर्तता करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(5) सदर पूलाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी प्राप्त झाली असून निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे.

(6) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**करंजविहीरे-आसखेड, चाकण-तळेगाव (ता.खेड, जि.पुणे) येथे क्षमतेपेक्षा जास्त वाहनांच्या वाहतुकीमुळे रस्ता धोकादायक झाल्याबाबत**

**(२०) * ७१२२७ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण-गडद-वांद्रे या प्रमुख जिल्हा रस्त्यावर करंजविहीरे-आसखेड (ता.खेड, जि.पुणे) येथे सदर रस्ता १० ते १२ टन वजन क्षमतेच्या वाहतुकीचा असताना त्यावरून ४० टन क्षमतेपेक्षा जास्त वजनाची वाहतूक केली जात असल्याने सदरच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने रस्ता वाहतुकीस धोकादायक झाला असल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता (चाकण) यांच्याकडे माहे ऑगस्ट २०१६ मध्ये वा त्यादरम्यान वारंवार लेखी निवेदनाद्वारे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच चाकण - तळेगाव रस्ता रा.मा.क्र,५५ हा रस्ता औद्योगिक वसाहत व चाकण शहरालगत असून वर्दळ व अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असून सन २०१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे रस्त्याचा पृष्ठभाग खराब झाल्याने गाव मौजे खालुम्ब्रे, म्हाळुंगे, खराबवाडी व चाकण या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होऊन वारंवार अपघात व जीवित हानी होत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०१६ वा त्यासुमारास सदर रस्त्याच्या विशेष रस्ते दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत दुरुस्ती व्हावी असे निवेदन मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही, हे खरे नाही.
तथापि लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांना या संदर्भाने मौखिक मागणी केली आहे.
(२) होय.

श्री. सुरेश नामदेव गोरे, वि.स.स. यांचे दि. ९/१०/२०१६ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(३), (४) व (५) प्रश्नांकित रस्ता प्रजिमा १७ लांबी ७०.९० कि.मी. व रा.मा. ५५ लांबी २३ कि.मी. या दोन रस्त्यांचा भाग आहे. या रस्त्यावरुन अवजड वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणात आहे. रस्ता काही प्रमाणात क्षतिग्रस्त झाला आहे. रस्त्यांच्या काही भागात रुंदीकरण, मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम करणे आवश्यक असून ही कामे निकष मंजूरी निधि व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे. रस्त्यांच्या डांबरी पृष्ठभागाचे नूतनीकरणाचे ९७० मी. लांबीसाठी एक काम मंजूर असून काम हाती घेण्यात येत आहे. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे डांबरमिश्रित खडीने भरण्याचे काम प्रगतीत आहे. रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे.

-----------------

## आवरे (ता.उरण, जि.रायगड) येथील चित्रा जहाजाच्या दुर्घटनेमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई मिळण्याबाबत

**(२१) * ६५९९८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आवरे (ता.उरण, जि.रायगड) येथील कडापे मच्छिमार विकास संस्थेच्या ५२ सदस्यांना रायगड जिल्हयाच्या समुद्र किनारी चित्रा जहाजाच्या दुर्घटनेमुळे झालेल्या नुकसानाची तातडीने भरपाई मिळावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑगस्ट, २०१६ वा त्या दरम्यान आयुक्त, मत्स्य व्यवसाय विभाग यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चित्रा जहाज बुडाल्यामुळे संपूर्ण किनारपट्टीवर पसरलेल्या तेल तवंगामुळे मत्स्य उत्पादन कमी झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मत्स्य उत्पादन कमी झाल्याने मत्स्य व्यवसायावर परिणाम होवून जिल्हयातील बहुसंख्यीक मच्छिमारांच्या उपजिवीकेचे साधन नष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती मच्छिमारांना त्वरित भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, अंशत: खरे आहे.

समुद्र किनारपट्टीवरील मासेमारीवर काही कालावधीकरीता तेल तवंग नष्ट होईपर्यत मच्छिमारांना मासेमारी करणे शक्य झाले नाही. परिणामी या कालावधीत मच्छिमारांच्या प्रमुख दैनंदिन उपजिविकेच्या साधनांवर मर्यादा आली होती.
(४) अपघात ग्रस्त जहाज मालक कंपनीकडून नुकसान भरपाईची मागणी करण्यात आली होती. त्यास प्रतिसाद न मिळाल्यामुळे संबंधित कंपनी विरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रु. ८.०५ कोटी इतक्या रकमेचा दावा शासनाच्या वतीने दाखल करण्यात आला आहे. प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि. पालघर) तालुक्यात अतिवृष्टीमुळे बागायतदारांचे नुकसान झाल्याबाबत

**(२२) * ६६८२७ श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यात दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी अतिवृष्टी होऊन बागायती मधील चिकू फळांची पडझड होऊन बागायतदारांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डहाणू तालुक्यात चिकू हे प्रमुख फळ पिक असून साडेचार हजार हेक्टर क्षेत्र बागायतीने व्यापलेले असून बागायदारांनी कर्ज काढून विविध खते व औषधे इत्यादीकरिता मोठी आर्थिक गुंतवणूक केलेली असताना अतिवृष्टीमुळे चिकू फळाचे व बागेचे नुकसान झाल्यामुळे नुकसानभरपाई मिळण्याबाबत कृषि विभाग,

डहाणू यांच्याकडे दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेवर जाऊन पंचनामे करुन चिकू बागायतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

तथापि, दि.८ ऑगस्ट,२०१६ रोजी डहाणू तालुक्यात चिकू फळपिकांवर बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव होवून फळगळ होत असलेबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) ऑगस्ट, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात पडलेल्या सततच्या पावसामुळे हवेतील आद्रतेत वाढ होवून फायटोप्थोरा या बुरशीजन्य रोगाची लागण झाल्यामुळे चिकू या फळाची फळगळ झाल्याचे दिसून आहे. त्यामुळे सदर रोगाच्या अनुषंगाने कृषि विभागाकडून उपाययोजना करण्यात आल्या असून त्यानुसार किटकनाशके ५० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना पुरवठा करण्यात आली आहे. तसेच हवामानावर आधारीत फळपिक विमा योजनेंतर्गत चिकू फळपिकांचे पिक विमा योजनेत ४५३ शेतकऱ्यांनी १०२८.६३ हेक्टरवर विमा रक्कम रु.२५,७५,०७५/- बँकेमार्फत भरणा केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या स्कूलबस परवान्याशिवाय चालविण्यात येत असल्याबाबत

**(२३) * ७१४६५ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या सुमारे एक हजार स्कूलबस परवान्याशिवाय चालविण्यात येत असल्याची माहिती माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पटवर्धनबाग परिसरात याच महिन्यात दहा विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या स्कूल व्हॅनमधील सीएनजीने पेट घेतला परंतु चालकाने वेळीच या विद्यार्थ्यांना बाहेर काढल्याने फार मोठी दुर्घटना टळली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती शालेय विद्यार्थीच्या वाहतुक व्यवस्थेच्या धोरणाच्या अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (1) दै. पुढारी या वृत्तपत्रात दि. 08.10.2016 रोजी स्कूल बस धावताहेत तपासणीविनाच या मथळयाखाली वृत्त प्रसिध्द झाले आहे.
(2) होय.
(3) व (4) प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांनी चौकशीअंती सदर वाहनाचा परवाना व नोंदणी रद्द केली आहे.
शालेय विदयार्थ्याच्या वाहतुकीचे नियमन करण्यासाठी शासनाने दि. 22.03.2011 च्या अधिसूचनेप्रमाणे महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बस करिता विनियम) नियम 2011 प्रमाणे जारी केले आहे. सदर स्कूल बस धोरणाची राज्यात काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत असते.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात विदर्भ व मराठवाड्यासह अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान**

**(२४) * ६५१६४ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला**

**गावित (इगतपूरी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विदर्भ व मराठवाड्यासह सोयाबीन, कापूस, कडधान्ये आणि इतर पिकांचे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर २०१६ च्या झालेल्या अतिवृष्टीमुळे सुमारे ५० टक्क्यापेक्षा अधिक नुकसान झाले असून मराठवाड्यातील सुमारे २५ लाख हेक्टर पिकांची नासधूस झाल्याची माहिती मा.कृषी मंत्री यांनी दिनांक ३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिली, हे खरे आहे काय,

(२) तसेच परांडा, भूम व वाशी (जि.उस्मानाबाद) तालुक्यात दिनांक २१ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर, २०१६ या दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे २६ हजार शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूस्खलन होऊन सुमारे ३ लाख ८ हजार हेक्टर जमिनीवरील सोयाबीन, तूर, बाजरी, मुग, उडीद, कापूस व मका या पिकांसह भाजीपाला व फळबागांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे मराठवाडयात परतीच्या पावसाने निर्माण झालेल्या पूर परिस्थितीमुळे या भागातील शेती पिकांसह घरे, स्थावर मालमत्ता व जीवित हानी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(५) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार नुकसानग्रस्तांना तसेच मृतांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) अतिवृष्टीमुळे शेतीपिकांची नुकसानभरपाई देण्यासाठी, झालेल्या नुकसानीची आकडेवारी क्षेत्रीय कार्यालयांकडून अचूक पंचनामे करुन मागविण्यात आली आहे. सदर माहिती संकलीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्याची बाब प्रगतीपथावर आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण ते शीळफाटा (जि.ठाणे) या उन्नत मार्गाचा विस्तार भिवंडीपर्यंत करण्याबाबत

**(२५) * ६७६४९ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे - कल्याण- नवी मुंबई या त्रिकोणातील वाहतूक व्यवस्थेत सुधारणा व्हावी यासाठी कल्याण ते शीळफाटा या मार्गावर उन्नत मार्ग उभारण्याच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाचा विस्तार थेट भिवंडीपर्यंत करण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाबाबत घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे,

मंत्रीमंडळाच्या पायाभुत सुविधा समितीने दि. ३०.११.२०१५ रोजीच्या बैठकीत भिवंडी-कल्याण-शिळफाटा या रस्त्यावर उन्नत मार्गाचे बांधकाम करण्याच्या प्रकल्पाचा सुसाध्यता अभ्यास व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तसेच म.रा.र.वि.महामंडळाला कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून घोषित करण्यासाठी मान्यता दिली आहे. सदर मान्यतेस अनुसरुन दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यामध्ये शिळफाटा ते भिवंडी वळण रस्त्यापर्यंत एकुण २१.० किमी लांबीचा वाव प्रस्तावित आहे.

(२), (३) व (४) प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात येवून सविस्तर प्रकल्प अहवालाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

सदर रस्त्याचे संपूर्ण लांबीत सहापदरीकरण व बदलापूर जंक्शन ते पत्रीपुल लांबीत उन्नत मार्गाचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित असुन निधीचे उपलब्धतेनुसार प्रकल्प हाती घेण्यात येईल.

-----------------

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील शेतकऱ्यांचे पॉवर टिलर व मोठे ट्रॅक्टर यांचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(२६) * ६९९५६ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील सुमारे ४०४ शेतकऱ्यांचे पॉवर टिलर व मोठे ट्रॅक्टर यांचे अनुदान गेल्या ५ वर्षापासून प्रलंबित असल्याची बाब स्थानिक शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ वा त्या सुमारास जिल्हयाचे मा.पालकमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती शेतकऱ्यांना प्रलंबित अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) दिनांक ३० सप्टेंबर,२०१६ रोजीच्या पत्रान्वये मा.मंत्री आदिवासी विकास विभाग यांना निवेदन दिलेले आहे.

(२) व (३) कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत जिल्हयास उपलब्ध झालेल्या अनुदानाच्या मर्यादेत पूर्वसंमती देण्यात येते. पूर्वसंमती प्राप्त शेतकऱ्यांनाच अनुदान देय आहे.

पालघर जिल्हयातील शेतकऱ्यांनी कोणत्याही प्रकारची पूर्वसंमती नसतांना परस्पर कृषी उद्योग विकास महामंडळाकडून खरेदी केलेली आहे व अनुदानासाठीचे प्रस्ताव कृषी विकास अधिकारी, जिल्हापरिषद, ठाणे यांचेकडे सादर केले आहेत. सदर शेतकरी अनुदानासाठी पात्र नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पणज (ता.अकोट, जि.अकोला) महसूल मंडळ व लगतच्या परिसरातील शेतकऱ्यांची विमा रक्कम अदयाप अदा न केल्याबाबत

**(२७) * ६७८६३ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पणज (ता.अकोट, जि.अकोला) महसूल मंडळ व लगतच्या परिसरातील शेतकऱ्यांना सन २०१३-२०१४ मधील केळी पिक नुकसानाच्या विम्याची रक्कम अदयाप देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शेतकऱ्यांना विम्याची रक्कम मिळविण्यासाठी ग्राहक मंचाकडे जावे लागत असून परिसरातील केळी पिकाच्या नुकसानीचा वस्तुनिष्ठ पंचनामा न केल्याने आर्थिक मोबदला मिळण्यास अपात्र ठरविण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती शेतकऱ्यांना पिक नुकसान भरपाई देण्याबाबत व भविष्यात अशी पुनारावृत्ती होणार नाही यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**करमाळा (जि. सोलापूर) तालुक्यातील उजणी जलाशयामुळे पुनर्वसित झालेल्या गावांना नागरी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२८) * ७०००१ श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणास मंजूरी मिळून प्रत्यक्ष धरण अस्तित्वात येऊन ४५ वर्षाचा कालावधी उलटून गेलेला असतानाही सोलापूर, पुणे आणि अहमदनगर या जिल्ह्यातील सुमारे १३५० धरणग्रस्तांचे अद्‌याप पूर्णक्षमतेने पुनर्वसन करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच करमाळा (जि. सोलापूर) तालुक्यातील उजणी जलाशयामुळे पुनर्वसित झालेल्या ३० गावांना अद्‌यापपर्यंत नागरी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नसून मौजे रिटेगाव या गावास जोडला जाणारा जोडरस्ताही अद्‌याप तयार करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणग्रस्तांचे तातडीने पुनर्वसन करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री व मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रकल्प हितवर्धत क्रांतीकारी संघटना यांचेमार्फत दिनांक २८ जून, २०१६ रोजी वा सुमारास करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उजनी धरणामुळे बाधित झालेल्या प्रकल्पगंस्तांचे पूर्णक्षमतेने पुनर्वसन व मौजे रिटेगाव या गावास जोडला जाणारा जोडरस्ताही तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्हयातील करमाळा तालुक्यातील ३० गावांना देय एकूण ५४० नागरी सुविधांपैकी ३८७ सुविधा पुरविण्यात आल्या असून, मौजे रिटेवाडी येथील पोहोच रस्ता या नागरी सुविधेसह उर्वरीत १५३ नागरी सुविधा पुरविणे बाकी आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

उजनी प्रकल्पांतर्गत सोलापूर, पुणे व अहमदनगर जिल्हयातील बाधित एकूण १०,१६१ प्रकल्पग्रस्तांपैकी पात्र ४९८७ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आले असून, प्रकल्पग्रस्तांना ११०६८ भूखंडाचेही वाटप करण्यात आले आहे.

रिटेवाडी या गावास जोडणा-या रस्त्याची अंदाजपत्रके विभागीय आयुक्त यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## पूर्णा (जि.परभणी) तालुक्यातील गोदावरी नदीतून अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याबाबत

**(२९) * ७०५८९ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्णा (जि.परभणी) तालुक्यातील ओझूर व खरवाडा या परिसरातील गोदावरी नदीतून मोठया प्रमाणात अवैध रित्या वाळू उपसा होत असल्याची तक्रार ग्रामस्थ

व शेतक-यांनी दिनांक ४ जुलै, २०१६ व २२ जुलै, २०१६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) दिनांक ०४/०७/२०१६ रोजी वझर, ता. पूर्णा, जिल्हा परभणी येथील रेती तस्करां संदर्भात एक निवेदन जिल्हाधिकारी परभणी यांना प्राप्त झाले आहे.

(२) व (३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईत मौजे वझूर व मौजे खरबडा, ता. पूर्णा येथील एकूण २० वाळूसाठे जप्त करण्यात आले असून, त्याबाबत संबंधितांविरुध्द पोलीसात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व संबंधितांविरुध्द दंडात्मक कारवाईची प्रक्रियादेखील हाती घेण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे-कात्रज-गोगलवाडी फाटा महामार्गावरील रस्त्याची खड्ड्यांमुळे झालेली दुरवस्था

**(३०) * ६७३२५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, कात्रज ते गोगलवाडी फाटा महामार्गावरील रस्त्याची खड्ड्यांमुळे दुरवस्था झाली असल्याने अपघातांमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत असल्याची गंभीर बाब दिनांक ३ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची दुरवस्था झाल्याने वाहन चालकांना वाहने चालवताना त्रास होत असल्याच्या तक्रारी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे करुनही अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पुणे, कात्रज ते गोगलवाडी फाटा महामार्गावरील रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
रस्त्याचा डांबरीपृष्ठभाग अतिवृष्टीमुळे काही प्रमाणात क्षतिग्रस्त झाला आहे. पोलीस दप्तरीच्या माहितीवरुन रस्त्यावरील अपघातांच्या संख्येत वाढ झाली नसल्याचे दिसून येते.
(२) अशी बाब नाही.
(३), (४) व (५) प्रश्नांकित रस्ता रा.मा. १२६ असून, कात्रज- शिंदेवाडी दरम्यान रस्त्यांची लांबी ८.२०० कि.मी. आहे. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे डांबरमिश्रीत खडीने भरण्याचे काम प्रगतीत आहे. रस्त्याच्या २ कि.मी. लांबीतील मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम मंजूर असून निविदा स्तरावर आहे. उर्वरीत लांबीतील आवश्यक कामे मंजूरी निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे. सद्यस्थितीत रस्त्यावरील वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.

-----------------

## सांगली जिल्हयातील शेतकऱ्यांची बनावट संजीवके व खतांमुळे फसवणूक होत असल्याबाबत

**(३१) * ७००८३ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील संजीवके व खतांच्या पॅकींगवरती दिलेले प्रमाण व प्रत्यक्षात त्यामधील घटक यामध्ये मोठया प्रमाणात तफावत आढळून येत असून बनावट संजीवके व खते विकून शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याची बाब माहे ऑक्टोंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यांचा उत्पादन खर्च अत्यंत कमी असूनही विक्री करताना मात्र जास्त किंमत आकारुन मोठया प्रमाणात नफा मिळवण्यासाठी शेतकऱ्यांची फसवणूक केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामध्ये जिल्हयातील काही कृषी विक्री केंद्र व कृषी अधिकारी हे देखील या संजीवके व खत कंपन्यांना मदत करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित कृषी विक्री केंद्र, कृषी अधिकारी व फसवणूक करणा-या कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) अंशत: खरे आहे.

(२) उत्पादन खर्च व विक्री कींमत यावर या विभागाचे नियंत्रण नसते.

(३) हे खरे नाही.

(४) एकुण ४० अप्रमाणित आलेल्या खत साठयास विक्री बंद आदेश देवून उत्पादक व विक्रेते यांचेवर खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतुदी नुसार कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंदपूर जिल्हयात कपाशीच्या पिकांवर किडरोगचा झालेला प्रादुर्भाव

**(३२) * ६६७२१ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदपूर, भद्रावती, वरोरा व कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यात मोठया प्रमाणात घेतलेल्या कपाशीच्या पिकांना किडीची लागन होऊन रोगांचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यात कपाशीचे पीक उदध्वस्त होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याची पाहणी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, कपाशीच्या पिकांवर रोगप्रतिबंधक उपाययोजना करण्याच्यादृष्टीने व पिक विमा योजनेतून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२) व (३) चंद्रपूर, भद्रावती, वरोरा व कोरपना तालुक्यांमध्ये प्रादुर्भावाची तीव्रता अनुक्रमे ०.९९%, २.३९%, २.३२% व ०.९९% एवढी असून १००% क्षेत्र उपचारित केले आहे.

(४) कृषि विभागाच्या कर्मचाऱ्यांच्यामार्फत प्रत्यक्ष शेतावर जावून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. किडीच्या नियंत्रणाकरिता क्रॉपसॅप प्रकल्पांतर्गत व विविध योजनांतर्गत प्रत्येक तालुक्यास ट्रायझोफॉस २० लि., सायपरमेथीन ५० लि. या औषधांचा पुरवठा ५०% अनुदानावर करण्यात आला आहे.

वेळीच उपायोजना करण्यात आल्याने किडरोग नियंत्रणात आला. किड रोगांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान संकेत पातळीच्या खाली आढळून आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्हयातील तापमानात झालेल्या बदलामुळे केळी शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

**(३३) * ६८२४९ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयातील हवामान आधारित फळपिक विमा योजनेत सहभागी झालेल्या केळी उत्पादकांना संरक्षण कालावधी संपला तरी अद्याप माहे सप्टेंबर, २०१६ पर्यंत नुकसान भरपाईचे वाटप झाले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ डिसेंबर, २०१५ ते २९ फेब्रुवारी, २०१६ तर दिनांक १ मार्च, २०१६ ते ३१ जुलै, २०१६ या कालावधीत तापमानात बदल झाल्याने केळी शेतक-यांचे प्रचंड नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील पश्चिम द्रुतगती महामार्ग व सायन - पनवेल नव्याने बनविलेल्या टोलमार्गाची झालेली दुरवस्था

**(३४) * ७०३३५ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे ते दहिसर पश्चिम द्रुतगती महामार्ग तसेच सायन - पनवेल टोल महामार्गावरील सर्वच उडडाणपूल व मुख्य मार्गावर खडडे असल्याचे माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) सायन - पनवेल महामार्गावरील मानखुर्द येथील रस्त्याच्या झालेल्या दयनीय अवस्थेमुळे व पडलेल्या मोठ मोठया खडडयांमुळे अपघात होऊन जीवीत हानी होण्याच्या प्रमाणात वाढ झालेली असल्याने दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधिंनी पत्रव्यवहार करुनही अदयाप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पश्चिम द्रुतगती महामार्ग, सेवामार्ग व सायन - पनवेल महामार्गावरील रस्त्यांची पावसाळ्या अगोदर पुनर्बांधणी किंवा डांबरीकरण करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे करुनही संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व कंत्राटदारांविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच खडडे बूजवून आगामी पावसाळयात पुन्हा खडडे पडू नयेत याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

पश्चिम द्रुतगती महामार्ग व सेवा रस्ता तसेच सायन- पनवेल महामार्गावर पावसाळयात पडलेले खड्डे या विभागामार्फत भरून महामार्ग व सेवा रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(२) सायन पनवेल महामार्गावरील मानखुर्द येथील रस्त्यावरील सर्व खड्डे भरण्यात आलेले असून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

(३), (४), (५) व (६) नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पश्चिम द्रुतगती महामार्ग, सेवा रस्ता हे रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

सायन-पनवेल रस्ता हा खाजगीकरणातंर्गत पूर्ण करण्यात आला असल्याने सवलत कालावधीमध्ये रस्त्याच्या संपूर्ण देखभाल दुरूस्तीची जबाबदारी उद्योजकाची आहे. तथापि उद्योजक देखभाल दुरूस्तीचे काम पूर्णरीत्या करीत नसल्याने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत उद्योजकाच्या 'Risk and Cost' वर पावसाळयात तातडीने दुरूस्तीची कामे केली असून, सध्या रस्ता सुस्थितीत आहे.

पश्चिम द्रुतगती मार्गाच्या मजबुतीकरण आणि डांबरीकरणाचे काम निधी, निकष व प्राथम्यक्रमाने हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## सातारा ते पुणे दरम्यान असलेल्या महामार्गाच्या सहापदरीकरणाचे काम अतिशय संथगतीने व निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(३५) * ६९१३७ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे - बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील सातारा ते पुणे दरम्यानच्या महामार्गाचे सहापदरीकरणाचे काम अतिशय संथगतीने व निकृष्ट दर्जाचे करुन सदर कंपनीने नियमांचे उल्लंघन केल्याने या कंपनी विरोधात तातडीने कारवाई करण्यात यावी अशी मागणी पुणे विभागाच्या आयोजित केलेल्या बैठकीत सातारा लोकसभा मतदारसंघाचे मा.खासदार यांनी मा.केंद्रीय भूपृष्ठ वाहतुक मंत्री यांचेकडे दिनांक १७ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातारा ते पुणे हया महामार्गाचे सहापदरीकरणाचे काम पूर्ण करण्याचा कालावधी किती, या कालावधीत कंपनी मार्फत टोलवसुली करण्यात येत होती त्यानुसार कंपनीने किती रूपयाची वसूली केली असून या कामाला अंदाजे येणारा खर्च किती कोटी रूपये होता याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या कंपनीने केलेल्या कराराप्रमाणे काम न केल्यामुळे त्यांचेविरोधात कारवाई करण्याबाबत तसेच मा.केंद्रीय भूपृष्ठ वाहतुक मंत्री यांच्या सुचनेनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) होय हे खरे आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे मार्फत खाजगी करणातून पुणे ते सातारा हया १४० कि.मी.महामार्गाचे सहापदरीकरणाचे काम दि.३१/१२/२०१५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. तथापि जुने भुसंपादन प्रकरणे, वृक्ष छाटणी परवानगी,वनजमीनीचे हस्तांतरण,कामाच्या वावात बदलाची मागणी, सेवा वाहिन्यांचे स्थलांतर हया कारणामुळे विलंब झालेला आहे.

हया प्रकल्पाला रु.१७२४.२५ कोटी खर्च अपेक्षित आहे. हया महामार्गाच्या पथकर नाक्यावर दि.१०.११.२०१६ अखेर चौपदरीकरणाच्या प्रकल्पासाठी सुरु असलेल्या पथकरापोटी रु.१०५७.९३ कोटी वसूली झाली असून त्यापैकी रु.६३३.७५ कोटी सवलतकाराने केंद्र शासनाकडे जमा केले आहे असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

-----------------

## मुंबई नाशिक मार्गावर गॅमन इंडिया कंपनीने हॉटेल मालकांना दुभाजक तोडून रस्ता दिल्याबाबत

**(३६) * ७०६८१ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्या मुंबई - नाशिक महामार्गावर होणारी वाहतूक कोंडीमुळे व वाढत्या अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने सदर महामार्गावर भिवंडी येथील वडपे खिंड ते इगतपूरी तालुक्यातील गोंदेदरम्यान रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम दिलेल्या गॅमन इंडिया कंपनीने या महामार्गावरील १३ हॉटेल मालकांना सोयीचे व्हावे यासाठी रस्त्याच्यामध्ये असलेले दुभाजक तोडून मधून रस्ता दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुभाजक तोडल्याने अपघाताचे प्रमाण वाढले असल्याने वाहतूकदार व प्रवाशी यांनी शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे गॅमन इंडिया कंपनी व महामार्ग प्रशासन यांच्या विरोधात गुन्हा दाखल करावा अशी मागणी अनेक वेळा लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गॅमन इंडिया कंपनी विरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नसून काही हॉटेल मालकांनी अनधिकृतपणे दुभाजक तोडले असल्याने त्यांचेविरुध्द पोलीसांत तक्रार नोंदविल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,नाशिक यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चांदुर रेल्वे व तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(३७) * ६७१७५ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा नदीतून रेती माफियांनी क्षमतेपेक्षा जास्त रेती उपसा करुन चांदुर रेल्वे, तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील रस्त्याने रेतीची अतिभारक्षमतेने वाहतुक केल्याने रस्त्यांची दुरवस्था होऊन रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खडडे पडल्याने रस्त्यावर अपघात होवून अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची दुरुस्ती करुन रेती उपसा करणा-या माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अमरावती जिल्हयातील चांदुर रेल्वे व तिवसा तालुक्यात अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंबेगांव (जि.पुणे) तालुक्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे न केल्याबाबत

**(३८) * ६९०४० श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगांव (जि.पुणे) तालुक्यातील ४९ गावामध्ये माहे जुलै-ऑगस्ट, २०१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांच्या नुकसानीबाबत पंचनामे करण्याचे जिल्हाधिकारी, पुणे यांनी आदेश देऊनसुध्दा नुकसानीबाबतचे पंचनामे केले नसल्याची बाब दिनांक ५ ऑक्टोबर, २०१६ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, पुणे यांचे सोबत घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये त्यांच्या निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टी झाल्यानंतर त्वरीत ४८ तासात पीक नुकसानीबाबत पंचनामे करणे बंधनकारक असतानाही पंचनामे न केल्याने सदर बैठकीमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी नुकसानीबाबत त्वरीत पंचनामे करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने तात्काळ पंचनामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व या प्रकरणी पंचनामे करण्यास हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. अंशतः खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) आंबेगाव तालुक्यातील अतिवृष्टीने बाधित ४९ गावामध्ये शेतातील बांधाची फुटतुटीचे पंचनामे करण्याचे काम पूर्ण करण्यात आले असून नुकसानीचा अहवाल कृषि संचालक, विस्तार व प्रशिक्षण, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांचेकडे जिल्हाधिकारी पुणे यांनी पाठविला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील ठिबक सिंचनाचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत

**(३९) * ६६९०४ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील सन २०१२-१३ या वर्षातील ठिबक सिंचन अनुदान योजनेच्या प्रस्तावातील सुमारे १२२७ लाभार्थ्यांचे रु.३६४.६२ लाख प्रस्तावांची रक्कम प्रलंबित असून प्रस्तुतचा निधी तातडीने मिळावा याकरिता लोकप्रतिनिधींनी दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पुणे यांचेकडे पत्रान्वये मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील सन २०१२-१३ या वर्षातील ठिबक सिंचनाचे प्रलंबित अनुदान तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, पुणे यांच्या मागणीनुसार सन २०१२-१३ या वर्षातील प्रलंबित प्रस्तावांसाठी रु.२१.५५ कोटी एवढा निधी सन २०१४-१५ या वर्षात उपलब्ध करुन देण्यात आला होता. तथापि, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, पुणे यांनी पुन्हा सन २०१२-१३ या वर्षातील रु. ३६४.६२ लाख रकमेचे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे कृषी आयुक्तालयास कळविले आहे व सदर रकमेची मागणी केलेली आहे. सदर प्रस्तावांची छाननी करुन अनुदान देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## न्हावरे-तळेगाव ढमढेरे - शिक्रापूर (जि.पुणे) या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(४०) * ६७२६८ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्हावरे-तळेगाव, ढमढेरे-शिक्रापूर (जि.पुणे) हा रस्ता बीयुटी तत्वाखाली बांधकाम करण्यासाठी ४४१ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मार्च २००९ पासून या रस्त्याचे बांधकाम बीयुटी तत्वाखाली होणार असल्याने दुरुस्ती करण्यात न आल्याने रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या साईडपट्टया खचल्याने रस्ता वाहतूकीस धोकादायक झाला असल्याने नागरीकांना वाहतूकीस त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्याची दुरुस्ती व नवीन रस्त्याच्या बांधकामाबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) शासनामार्फत रस्त्याची दुरूस्ती करण्यात येत आहे. पुढील कार्यवाही राष्ट्रीय महामार्ग यांचेकडून होईल.

(५) नवीन भूसंपादन कायद्यातील बदलामुळे व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे (MCA) ९०% भूसंपादन झाल्याखेरीज रस्त्याचे चौपदरीकरण करता येऊ शकत नसल्याने मंजूर काम कार्यान्वित होण्यास विलंब झाला आहे. प्रस्तुत रस्ता तत्वत: राष्ट्रीय महामार्ग घोषित झाल्याने पुढील कार्यवाही राष्ट्रीय महामार्ग यांचेकडून होईल.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील प्रकल्प उपसंचालक (आत्मा) यांच्या गैरकारभाराबाबत

**(४१) * ६५२६४ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील प्रकल्प उपसंचालक (आत्मा) यांच्या गैरकारभाराबाबत त्यांच्याविरुध्द त्वरीत प्रशासकीय कारवाई करण्याबाबतचे निवेदन अध्यक्ष, किसान दिशा शेतकरी उत्पादक कंपनी लि. हिंगोली यांनी जिल्हाधिकारी, हिंगोली यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या अनुषंगाने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विभागीय कृषि सहसंचालक, लातूर विभाग या कार्यालयाकडून दिनांक ६ ऑक्टोबर, २०१६ रोजी चौकशी पथक पाठविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन शासनाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.
(२) दि. ६.९.२०१६ व दि.६.१०.२०१६ रोजी विभागीय कृषि सहसंचालक, लातूर विभाग, लातूर या कार्यालयाकडून चौकशी पथक पाठविण्यात आले होते.
(३) प्राथमिक चौकशी अहवालानुसार श्री.एम.डी.जाधव प्रकल्प उपसंचालक (आत्मा) व श्री. पी.एस.डहाळे हे दोषी आढळून येतात. त्यांच्यावरील आरोपानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील कृषि कार्यालयात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेत झालेला गैरव्यवहार

**(४२) * ६६३५२ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील कृषी कार्यालयात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेत लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सदर गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) याप्रकरणी तालुका कृषी अधिकारी, नेवासा यांनी भ्रष्टाचार केल्याबाबतची तक्रार जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अहमदनगर यांच्याकडे प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली असून चौकशी अधिकाऱ्यांचा चौकशी अहवाल प्रतिक्षेत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखली (जि.बुलडाणा) येथे अधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरीकरुन जमिनी अकृषक करण्यात आल्याबाबत

**(४३) * ७१०५३ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलडाणा) येथील तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसिलदार आणि भूखंडमाफीयांनी संगनमत करुन दिनांक २२ नोव्हेंबर, २०१० ते दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत १९ शेतमालकाच्या जमीनीचे अकृषक करण्याकरीता उपविभागीय अधिकाऱ्याच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह बनावट आदेश तयार करुन वितरित केल्याची धक्कादायक माहिती दिनांक १० ऑक्टोंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बनावट आदेश तयार करणाऱ्या संबंधित आधिकाऱ्यांवर भूखंड माफीयांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) चिखली (जि. बुलढाणा) शहरामध्ये मोठ्या प्रमाणात बनावट अकृषिक परवानगीचे आदेश निर्गमित झाल्याविषयी प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी अप्पर जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या अध्यक्षतेखाली दि. २४/११/२०१५ च्या आदेशान्वये चौकशी समिती गठीत केली होती. या समितीने तपासणी केलेली २९६ प्रकरणे तसेच तलाठी दप्तर तपासणीमध्ये मिळालेली १२८ प्रकरणे अशा एकूण ४२४ प्रकरणांचे पुनरीक्षण करण्यात येत आहे. त्यापैकी आतापर्यंत १४ प्रकरणात पुनरीक्षणाची कार्यवाही पुर्ण करण्यात आली आहे. सदर कार्यवाहीत आढळून आलेल्या अनियमितता प्रकरणी दि.०८/१०/२०१६ रोजी पोलीस स्टेशन, चिखली येथे अपराध क्र. ४९६/२०१६ अन्वये संबंधित तत्कालीन तलाठी, तत्कालीन मंडळ

अधिकारी व तत्कालीन नायब तहसिलदार व इतर १६ संबंधित भूधारक अशा एकूण १९ व्यक्तींविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यातील राष्ट्रीय मागासवर्गीय खुले कृषी महाविद्यालयात कृषी पदविका अभ्यासक्रमात विदयार्थ्यांची झालेली फसवणूक**

**(४४) * ६६४१७ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यात "राष्ट्रीय मागासवर्गीय खुले कृषी महाविद्यालय" येथे कृषी पदविका अभ्यासक्रमात पंचायत राज्य मंत्रालयाचा कृषि व्यावसायिक ग्रामीण विकासाचा उपक्रम असल्याचे भासवून विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी प्रोत्साहित करुन बनावट कृषी विद्यापीठात सन २०१४ मध्ये पहिल्या वर्षी ४९ विद्यार्थ्यांनी व दुसऱ्या वर्षी ३८ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कृषी महाविदयालयात पंचायत राज्य व्यवस्थेच्या नावाचा, बोधचिन्हांचा व संस्थेचे नाव तीन वेळा बदलणे इत्यादी बाबत गैरकारभार केल्याचे निपाणी वाडगाव येथील विद्यार्थ्यांनी स्थानिक पोलीस स्टेशन व महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेकडे तक्रार दाखल केल्याची माहिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या फसवणूकी विरोधात संबंधितांविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल करुन शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती सर्व संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी निपाणी वडगाव येथील विद्यार्थी स्वानंद जाधव यांनी दि. १९/११/२०१६ रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपी रविंद्र साळवे यांच्या विरुध्द श्रीरामपूर शहर, पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २७९/२०१६, भा.दं.वि. कलम

४२०, ४६५ प्रमाणे दि. १९/११/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरचा गुन्हा तपासावर आहे.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## शिरपूर जैन (जि.वाशिम) येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची झालेली दुरवस्था

**(४५) * ६८०६६ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) शिरपूर जैन (जि.वाशिम) येथे शासनाने उभारलेल्या पशुवैद्यकीय दवाखान्याची दुरवस्था झाली असून सदर दवाखाना मोडकळीस आला असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पशुवैद्यकीय दवाखाना मोडकळीस आल्याने मागील वर्षी जनतेच्या मागणीवरुन जि.प.परिषदेच्या मार्फत २५ लक्ष खर्च करुन सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालेगाव अंतर्गत बांधकाम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पशुवैद्यकीय दवाखान्याचे काम ठेकेदाराने अत्यंत निष्कृष्ट दर्जाचे केले असून या दवाखान्याच्या इमारतीला तडे गेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर दवाखान्याची दुरुस्ती करण्याबाबत तसेच निकृष्ट काम केलेल्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

पशुवैद्यकीय दवाखाना शिरपूर जैन या दवाखान्याच्या नविन इमारतीचे बांधकाम दि.३०/११/१५ रोजी पूर्ण होऊन, सध्या या नवीन इमारतीमध्ये पशुवैद्यकीय दवाखान्याचे दैनंदिन कामकाज सुरू आहे.
(२) नवीन इमारतीच्या बांधकामासाठी सन २०१४-१५ मध्ये जिल्हा परिषद, वाशिम मार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेला रु. २१.०० लक्ष निधी खर्च करण्यात आलेला आहे.

(३) विट बांधकाम व आर.सी.सी. कॉलम यांचे जोडावर असलेल्या प्लास्टरच्या पृष्ठभागावर भेगा पडलेल्या आहेत.
(४) सदर इमारतीचे बांधकाम दोष दायित्व निवारण कालावधीत असल्यामुळे उपअभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, मालेगाव यांनी संबंधित ठेकेदारास बांधकामामध्ये उद्भवलेल्या त्रुटींची त्वरीत पुर्तता करुन देण्यासंदर्भात दिनांक. २१.१०.२०१६ च्या पत्रान्वये सूचीत केलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा कापूसतळणी (ता.जि.अमरावती) येथे अतिवृष्टीमुळे पेरणी केलेल्या बियाण्यांचे झालेले नुकसान

**(४६) * ६७९३० अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा कापूसतळणी (ता.जि.अमरावती) येथे दिनांक २७ व २८ जुलै, २०१६ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेत जमीन खरडून गेल्यामुळे पेरणी केलेली बियाणे वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील बाधित शेतकऱ्यांना शासनाच्या नैसर्गिक आपत्ती मदत योजनेअंतर्गत आर्थिक मदत मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शेतक-यांना आर्थिक मदत मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) संयुक्त पाहणी अहवालानुसार शेतीपिकांचे व खरडून गेलेल्या शेतजमीनीचे ३३% पेक्षा कमी नुकसान झाले असल्याने शासन नियमानुसार नुकसान भरपाई देय ठरत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विरसई (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे पशुवैद्यकीय दवाखाना मंजूर होण्याबाबत

**(४७) * ७०८६४ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरसई (ता.दापोली, जि.रत्नागिरी) हे आदर्श गाव असून या ठिकाणी पशुधनाची काळजी घेण्याकरिता पशुवैद्यकीय दवाखाना मंजूर होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधींनी माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मा.पशुसंवर्धन मंत्र्यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण व दुर्गम भागात पशुधनासाठी आरोग्याच्या सोयीसुविधा मिळाव्यात म्हणून पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ मंजूर होणे आवश्यक असल्याने याबाबत जिल्हा पशुवैद्यकीय अधिकारी यांनी दोन वेळा प्रस्ताव पाठवूनही शासनाने अद्याप कोणताही निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विरसई येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ मंजूर होण्याबाबत तसेच ग्रामीण व दुर्गम भागात पशुधनासाठी आरोग्याच्या सोयीसुविधा मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मौजे विरसई (ता.दापोली, जि.रत्नागिरी) या गावाच्या प्रस्तावित कार्यक्षेत्रातील एकुण पशुधन घटक संख्या केवळ १,४९८ एवढी असून, शासन निर्णय क्रमांक जिवायो-२०१०/प्र.क्र.२९१/पदुम ४, दि. ०१.०७.२०११ अन्वये, डोंगरी भागात व बिगर डोंगरी भागात नवीन पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ स्थापनेसाठी अनुक्रमे किमान ३,००० व ५,००० पशुधन घटक संख्या असावी, असा निकष आहे.

त्यामुळे, मौजे विरसई (ता. दापोली, जि. रत्नागिरी) येथे नवीन पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ स्थापन करणे निकषात बसत नाही. सद्यस्थितीत आदर्श गाव विरसई हे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२, केळशी या संस्थेच्या कार्यक्षेत्रात असून, सदर संस्थेमार्फत या गावास नियमितपणे पशुवैद्यकीय व पशुआरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत. तसेच, पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२, केळशी या दवाखान्यामार्फत विरसई या गावास आठवडी भेट केंद्र (Fix visit center) सुरु करुन, गावातील पशुधनास पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती व नागपूर विभागातील शेतकऱ्यांना पिक विम्याची निम्मी रक्कम मदत म्हणून देण्याचा घेतलेला निर्णय**

**(४८) * ६६५४९ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती व नागपूर विभागातील पीक विमा न काढलेल्या शेतकऱ्यांकडे पेरणीसाठी सुध्दा पैसे नसल्याने कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पीक रक्कमेच्या ५० टक्के रक्कम मदत स्वरुपात देण्याचा निर्णय शासनाने माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक व पीक विमा न काढलेल्यांना ही मदत देण्यासाठी प्रशासनाने पीक विमा न काढलेल्या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची माहिती देणे अपेक्षित असताना महसूल व कृषी विभागाकडून अद्यापपर्यंत जिल्ह्यातील पीक न काढलेल्या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची माहिती शासनाला पाठविण्यात न आल्यामुळे तीन लाख शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील मोर्शी व वरुड तालुक्यातील निकषांची पूर्तता करणा-या शेतक-यांना ८ कोटी २८ लक्ष रुपयांची मदत देणे आवश्यक असतानाही अद्यापपर्यंत शेतक-यांना मदत देण्यात आलेली नसल्याने अमरावती जिल्ह्यातील सर्वच शेतक-यांना तातडीने मदतीची रक्कम द्यावी अशी मागणी लोकप्रतीनिधिनी मा. कृषी मंत्री, यांचेकडे दिनांक ८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याच्या दृष्टीने व दिरंगाई करणाऱ्या संबंधितावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

दिनांक २ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये खरीप २०१५ मधील औरंगाबाद, नाशिक विभागातील कापूस, अमरावती विभागातील कापूस व सोयाबीन

व नागपूर विभागातील कापूस, सोयाबीन व धान पीकांच्या नुकसानीसंदर्भात विशेष मदत करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय.
(४) अमरावती व नागपूर विभागातील बाधीत शेतक-यांना अर्थसहाय्य देण्याची बाब उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असून त्या अनुषंगाने मा न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मंत्रालयाच्या मुख्य इमारतीचे दुरुस्ती आणि नुतनीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४९) * ६६५७३ श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१२ मध्ये मंत्रालयाच्या मुख्य इमारतीला लागलेल्या भिषण आगीमध्ये झालेल्या पडझडीची तातडीने दुरुस्ती आणि नुतनीकरण करण्यासाठी शासनाने युनिटी कन्स्ट्रक्शन कंपनीच्या माध्यमातून २२५ कोटी रुपये खर्च करुन दुरुस्ती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे केल्याने मंत्रालयात होणाऱ्या पडझडीमुळे व अडचणीमुळे मंत्रालयाच्या मुख्य व विस्तारित इमारतीच्या दुरुस्ती व नुतनीकरणासाठी २२५ कोटी तसेच वाहन तळ व अन्य कामांसाठी ८० कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाने नेमलेल्या आरकीटेक्ट राजा अडरी यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नुतनीकरण व दुरुस्ती प्रस्तावास मान्यता देऊन यापूर्वी निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

मंत्रालय मुख्य इमारतीच्या दुरूस्ती व नुतनीकरणासाठी युनिटी कन्स्ट्रक्शनच्या माध्यमातून रू.१५३.६४ कोटी खर्च झालेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कृषी विभागाने राज्यभरातून दुय्यम मिश्र खतांच्या घेतलेल्या नमुन्यांबाबत

**(५०) * ७०९९३ श्री.हरीभाऊ जावळे (रावेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागाने माहे जुलै - ऑगस्ट, २०१६ या दरम्यान राज्यभर मोहिम राबवून दुय्यम मिश्र खताचे तब्बल ५४४ नमुने घेवून प्रयोगशाळांमध्ये तपासणीसाठी पाठविण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५४१ नमुन्यांचे प्राप्त अहवालात ५०८ नमुन्यांचे अहवाल नकारात्मक आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती दोषी आढळणा-या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) कृषी आयुक्तालयाच्या गुणवत्ता नियंत्रण कामाच्या मार्गदर्शक सुचना सन २०१६-१७ अन्वये सुक्ष्म अन्नद्रव्ये मिश्र खते, सरळ सुक्ष्म अन्नद्रव्ये खते व दुय्यम अन्नद्रव्ये मिश्र खताचे नमुने काढण्यांचे लक्षांक क्षेत्रीय स्तरावर देण्यात आले होते. या अनुषंगाने जून, २०१६ ते जुलै, २०१६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या मोहिमेअंतर्गत ५४४ नमुने काढण्यात आले होते. त्यापैकी ५०८ नमुने अप्रमाणित आढळून आले. सदर प्रकरणी खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्याने संबंधीतांना कारणे दाखवा नोटीस देवून त्यांच्याविरुध्द खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतूदी नुसार कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## विदर्भात निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांची विक्री करणाऱ्या कंपन्याविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(५१) * ६५२४८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुर्व विदर्भातील शेतकऱ्यांनी यंदाच्या खरीप हंगामात निकृष्ट दर्जाच्या बियाणे विक्री करणाऱ्या कंपन्याविरुध्द कृषी विभागाकडे तक्रार केली असता नागपूर येथील कृषी विभागाने सोयाबिन, कापूस, धान या तीन पिकांच्या बियाण्यांचे एकूण १ हजार २०६ नमूने काढून ७३२ नमुन्यांची प्रयोगशाळेत तपासणी केली असता यशोदा हायब्रिड सिडस प्रा.लि, महाबिज, अंकूर सिडस प्रा.ली., बसंत ॲग्रोटेक प्रा.लि., ईगल सिडस ॲन्ड बायो, फार्म इनपुट ट्रेडिंग, महागुजरात सिडस, निर्मल सिडस, अजित सिडस, बायर बायो सायन्स प्रा.लि., कावेरी सिडस, कृषी धन सिडस, किर्तीमान ॲग्रो जेनेटिक्स, निझिविडू सिडस, नवकर हायब्रिड, श्री सत्या ॲग्री बायोटेक प्रा.लि, सोलर अगा्रटेक प्रा.लि., लाया सिडस प्रा. ली., दफतरी ॲग्रो सिडस प्रा.लि., केशव खनक सिडस, रायझिंग सन सिडस, माणिक्य सिडस, श्री गोकूल विश्वरुप सिडस या कपंन्याचे १०७ नमुने अहवाल अप्रमाणीत (फेल) आले असल्याची माहिती दिनांक १७ ऑक्टोंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) तसेच चौकशीअंती सदर कंपन्याविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) नागपूर विभागात माहे ऑक्टोबर, २०१६ अखेर सोयाबीन, कापूस व धानाचे एकूण २२३९ नमुने काढण्यात आले असून २११० नमुने तपासले आहेत. त्यापैकी १४३ नमुने अप्रमाणित आढळून आले आहेत.

(२) व (३) यासंदर्भात प्रयोगशाळेकडून अहवाल प्राप्त झाले आहे. अप्रमाणित नमुनेबाबत संबंधित कंपनीला व विक्रेत्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. कोर्ट केस पात्र नमुन्यावर बियाणे कायद्यांतर्गत नियमानुसार कार्यवाही सुरू आहे. मे.यशोदा हायब्रिड सिडस्, हिंगणघाट व मे.रायझिंग सिडस्, नागपूर यांचे

तक्रार प्राप्त वाणांवर निलंबनाची कारवाई केलेली आहे. तसेच इतर अप्रमाणित बियाणे नमुनेविषयक न्यायालयीन प्रकरणे न्यायालयात दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याच्या दृष्टीने ग्राहक मंचात जाण्याबाबत सुचित केलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**संपूर्ण राज्यभर "आरे" या दुधाचा एकच ब्रॅण्ड विकसित करण्याबाबत**

**(५२) * ६५३६० अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरातील दुध ग्राहकांना कमी दरात दुध उपलब्ध करुन देण्यासाठी गोकुळ, वारणा, कात्रज या संस्थाच्या मदतीने महाराष्ट्रात "आरे" या दुधाचा एकच ब्रँण्ड विकसित करण्याचा निर्णय राज्य सरकारने दिनांक ११ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यातील २६ दुध उत्पादक संघ सदर निर्णय रोखावा याकरिता गुजरातला स्वस्त दरात दुध देवून व्यवहार करित असल्याचे दिनांक ११ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास जिल्हा दुध संघाकडून महानंदला दुध वितरण होत नसल्याने महानंदला बाहेरून दुध घेवून वितरण करावे लागते, त्यामुळे राज्यातील शेतकरी आणि वितरकांचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती सदर दुध उत्पादकांनी सहकारी संस्थांच्या फेडरेशनला कोणतीच माहिती न देता व्यवहार करणाऱ्या दुध संघांवर कारवाई करण्याबाबत व राज्यातील दुध उत्पादन वाढीस प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) असा प्रस्ताव सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधिन नाही.

(२) हे खरे नाही,

(३) दि.१ एप्रिल, २०१६ ते ३१ ऑक्टो, २०१६ या कालावधीत सदस्य संघाकडुन दुध महासंघास अपुरा दुधाचा पुरवठा झाल्याने काही वेळा बाहेरुन दुध खरेदी करुन वितरण करावे लागले हे खरे आहे.

सदर दुध खरेदीवर जादा झालेला खर्च हा दुध महासंघास सोसावा लागलेला असुन यामध्ये राज्यातील शेतकरी व वितरकांचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

(४) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघास नियमित दूध पुरवठा करण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक, महानंद, मुंबई यांनी दि.१३.१०.२०१६ रोजी महासंघास दूध पुरवठा न करणा-या सदस्य संघांना पत्र दिले आहे.

तसेच राज्यातील दुग्ध उत्पादन वाढीस प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक गावात अथवा लहान गाव समूहासाठी बल्क मिल्क कुलर उपलब्ध करुन देण्याकरिता दुग्ध विकास दुग्धव्यवसाय विभागामार्फत सर्वेक्षण करण्यात येणार आहे. याशिवाय ज्या गावात दूध संस्था नाहीत तेथे त्या स्थापन करण्यासाठी किंवा अवसायनातील दूध संस्था पुनरुज्जीवित करण्यासाठी देखील कार्यवाही विचाराधिन आहे.

विदर्भ व मराठवाडा विभागामध्ये उर्वरित महाराष्ट्राचे तुलनेत दुग्धव्यवसाय विकास क्षेत्रातील प्रगती कमी असल्याने सदर विभागातील दुग्धव्यवसाय क्षेत्रास चालनादेण्यासाठी मराठवाडा विभागातील नांदेड,लातुर,उस्मानाबाद व जालना या चार जिल्हयांमध्ये व विदर्भातील अमरावती,अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वर्धा व नागपुर या सहा जिल्हयांमध्ये राष्ट्रीय दुग्ध विकास महामंडळाच्या सहभागाने राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत उपलब्ध होणा-या अर्थसहायाने विशेष प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

सदर प्रकल्प अंमलबजावणीमुळे येत्या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये २ लाख लिटर प्रतिदिन इतकी दुध उत्पादन वाढ अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील राज्य परिवहन महामंडळाच्या आगारातील रोकड आणि तिकीट विभागात झालेला गैरव्यवहार

**(५३) * ६९६४४ श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील राज्य परिवहन महामंडळाच्या आगारातील रोकड आणि तिकीट विभागात टोल टॅक्समध्ये लाखो रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झालेला असल्याची बाब दिनांक २३ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टोल टॅक्स नसलेल्या रस्त्यावर टोल टॅक्स भरण्यात येत असल्याचे आगारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने कागदोपत्री दाखविण्यात येवून गैरव्यवहार करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) नागपूर आगारामधील रोकड आणि तिकीट विभागात झालेल्या गैरव्यवहार प्रकरणाच्या प्राथमिक चौकशीत दोषी आढळलेले आगारातील रोखपाल श्री. के. जी. सोनटक्के यांना दिनांक २४.०९.२०१६ पासून निलंबित करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर चौकशी पथकाद्वारे स्वतंत्र चौकशी करण्यात येत असून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर निर्मल या राष्ट्रीय महामार्गाची खड्डयांमुळे झालेली दुरवस्था

**(५४) * ६७९४० श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर निर्मल या राष्ट्रीय महामार्गावर खडडे पडल्यामुळे महामार्गाची दुरवस्था झाल्याचे दिनांक २९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय महामार्गातून नांदेड जिल्हयातील हदगाव, अर्धापूर, मुदखेड, भोकर या तालुक्यातील प्रवाशांना तसेच जड-अवजड वाहनांना खड्डयातून जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रत्यावरील पडलेले खड्डे बुजवून रस्त्याचे मजबूतीकरण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय
(२) अंशत: खरे आहे. तथापि वेळोवेळी तात्पुरत्या स्वरुपात खड्डे भरले आहेत. पावसाळा लांबल्यामुळे कायम स्वरुपी खड्डे भरण्यास विलंब झाला असून, खड्डे भरण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) सदयस्थितीत खड्डे कायमस्वरुपी भरण्याचे काम प्रगतीपथावर असुन १५ डिसेंबर, २०१६ पुर्वी काम पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(५) पावसाळा लांबल्यामुळे खड्डे भरण्यास विलंब झाला आहे.

-----------------

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भातसा प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(५५) * ६७३६२ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भातसा प्रकल्पाच्या कामास सन १९६७ मध्ये सुरुवात करुन प्रकल्पाचे काम सन १९८८ मध्ये पूर्ण झाले मात्र अद्याप प्रकल्पग्रस्तांचे पूर्ण क्षमतेने पुनर्वसन झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व्हावे म्हणून ४५ वर्षात मा.मुख्यमंत्री व मा.जलसंपदा मंत्री यांना २७७ निवेदने स्थानिक लोकप्रतिनिधींनी देवूनही अद्याप पुनर्वसन झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भातसा प्रकल्पग्रस्तांचे तातडीने पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) भातसा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत लोकप्रतिनिधींकडून शासनास निवेदने प्राप्त झाली आहेत.

भातसा प्रकल्पासाठी भूसंपादनाची कार्यवाही सन १९६८-६९ मध्ये करण्यात आली होती. पूर्ण बुडीत क्षेत्रातील प्रकल्पबाधितांनी पुनर्वसनासाठी प्रस्तावित वन जमीन न स्विकारता स्वत:चे पुनर्वसन स्वत:हून करुन घेतले आहे. तसेच भातसा प्रकल्पग्रस्तांनी पर्यायी जमीन मिळण्यासाठी कब्जेहक्काची रक्कम भरुन नियमानुसार अर्ज केलेले नाहीत.

भातसा प्रकल्पातील ९६ प्रकल्पग्रस्त व्यक्तींना शासन सेवेत सामावून घेण्यात आले आहे. तसेच मा. उच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार प्रकल्पग्रस्तांच्या नेमणूका स्पर्धा परीक्षेद्वारे व गुणवत्तेनुसार करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील कन्हान आणि कोलार नदीवरील रेतीघाट रेतीमाफीयांना देण्यात आल्याबाबत

**(५६) * ६९२२३ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) तालुक्यामधील कन्हान आणि कोलार नदीवरील एकूण ३२ रेतीघाटाचे लिलाव करण्यात आले असून त्यातील बहुतांश घाट हे रेतीमाफीयांना देण्यात आल्याचे व त्यांनी शासनाच्या सन २०१२ पासूनचा ३५ लाखांचा महसूल जमा केला नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेतीमाफीया व महसूल विभागाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांमध्ये आर्थिक व्यवहार झाले आल्याच्या अनेक तक्रारी आल्या असून त्यावर शासनाने कुठलीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविणाऱ्या रेतीमाफियांवर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या महसूल विभागाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता सावनेर तालुक्यातील (जि.नागपूर) कन्हान व कोलार नदीवरील एकूण १० रेतीगटाचे लिलाव करण्यात आले असता, त्यापैकी ६ रेतीगट लिलावात गेले आहेत.

मौजे नंदापूर-ब, ता. सावनेर येथील रेतीगटात अवैध उत्खनन केल्याप्रकरणी तहसिलदार सावनेर यांनी दिनांक ३१/०३/२०१२ रोजी रुपये ३२,५८,८४६/- एवढ्या दंडाच्या रकमेचे आदेश पारीत केले होते. संबंधितांनी सदर आदेशाविरुध्द उपविभागीय अधिकारी सावनेर यांच्याकडे दाखल केलेल्या अपिलामध्ये उपविभागीय अधिकारी सावनेर यांनी सदर प्रकरणाची फेरचौकशी करुन, आदेश पारित करण्याचे आदेश दिले. त्यानुसार तहसिलदार सावनेर यांनी सदर प्रकरणाची फेरचौकशी करुन, रुपये १७,४३,९०६/- एवढ्या दंडाच्या रकमेचे आदेश दि. ८/११/२०१६ रोजी पारीत केले आहेत.

वरीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात आलेल्या एका व्यक्तीने मौजे साहोली-ब, ता. पारशिवनी येथील कन्हान नदीवरील वाळूगट या वर्षाच्या लिलावात सर्वोच्च बोली लावून प्राप्त केला आहे.

वाळूचोरी करणाऱ्या व महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाले असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुरुड-जंजिरा (जि.रायगड) शहरातील रस्त्यांच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(५७) * ६६७०१ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) मुरुड-जंजिरा (जि.रायगड) शहरातील विविध भागातील रस्त्यांचे नियमबाहय व सदोष डांबरीकरण करुन मोठया प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे नुकतेच माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निकृष्ट दर्जाच्या कामासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(५८) * ६५२५१ श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील गोदावरी नदी परिसरात दिनांक २ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास प्रचंड पाऊस पडल्याने प्रवरासंगम येथील घटेश्वर, सिध्देश्वर, रामेश्वर आदी अनेक मंदिरे पाण्याखाली गेली तसेच प्रवरासंगम पासून पैठण पर्यंत हजारो एकर जमीन पाण्याखाली गेली त्यामुळे अनेक वीज पंप व पिकेही वाहून गेली, हे खरे आहे काय,

(२) तसेच इगतपुरी, त्र्यंबकेश्वर व सिन्नर (जि.नाशिक) या तालुक्यांमध्ये अतिवृष्टीमुळे सुमारे ११०० हेक्टर क्षेत्रावरील शेती पिकांचे मोठया प्रमाणत नुकसान झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय. अंशत: खरे आहे.

(३) व (४) अतिवृष्टीमुळे शेतीपिकांची नुकसानभरपाई देण्यासाठी झालेल्या नुकसानीची आकडेवारी क्षेत्रीय कार्यालयांकडून अचूक पंचनामे करुन मागविण्यात

आली आहे. सदर माहिती संकलीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. यासंदर्भात प्राप्त होणा-या माहितीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबचा निर्णय घेण्याची बाब प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नायगाव (पुर्व) येथील सोपारा खाडीवरील लोखंडी पूल मोडकळीस आल्याबाबत**

**(५९) * ७१३६८ श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) नायगाव (पुर्व) येथील सोपारा खाडीवरील असलेल्या लोखंडी पूलाची मुदत कालबाह्य झाली असल्याने पावसाच्या पाण्याच्या प्रवाहामुळे केव्हाही पुल कोसळून अपघात होण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करुनही अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली तसेच सदरहू पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

पूल रेल्वे विभागाने बांधला असून तो महानगरपालिका क्षेत्रात आहे. पूल कमकुवत असून त्यावरील वाहतूक बंद करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी महानगरपालिकेस कळविले आहे.
(२), (३), (४) व (५) प्रश्नांकीत पूलाचे बाजूला नवीन पूलाचे बांधकाम करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रगतीपथावर आहे.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यात धरण प्रकल्पाचे पाणी सोडण्यात आल्यामुळे झालेल्या अपरिमित हानीबाबत

**(६०) * ६५८९५ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील खेड शहर व तालुक्यात दिनांक २१ व २२ सप्टेंबर, २०१६ रोजी अतिवृष्टी व पूर्वसूचना न देता नातूवाडी मध्यम धरण प्रकल्पाचे पाणी सोडण्यात आल्यामुळे पूरपरिस्थिती निर्माण होवून व्यापारी, नागरिक व शेतकरी यांची अपरिमित हानी झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००५ मधील अतिवृष्टीमध्ये झालेल्या नुकसानीपेक्षा अधिक नुकसान या अतिवृष्टीमध्ये झाल्याने नुकसानग्रस्तांना सन २००५ च्या निकषाप्रमाणे भरपाई देण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती नुकसानग्रस्तांना भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) शासन निर्णय दि.२७ ऑक्टोबर, २०१६ अन्वये दिनांक २२ ते २४ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या अतिवृष्टीमुळे खेड, चिपळूण, संगमेश्वर या तालुक्यांच्या बाजारपेठांमध्ये दुकानदार, टपरीधारक, हातगाडीधारक यांना एक विशेष बाब म्हणून अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील माणकोली व राजणोली उड्डाणपुलाचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(६१) * ६६२८७ श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक**

**पश्चिम), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील माणकोली व राजणोली उड्डाणपुलांच्या कामांची सुरुवात करण्याच्या आदेशाला दोन वर्ष होऊनही मे.सुप्रीम इन्फ्रा. कंपनीच्या गैरकारभारामुळे सदर उड्डाण पुलाचे काम पूर्ण झाले नसून अर्धवट झालेले काम अतिशय निकृष्ठ असल्याने याप्रकरणी चौकशी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री व मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे. सुप्रीम इन्फ्रा. कंपनीने बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने शासनाने ठरवून दिलेल्या नियमांचे उल्लंघन करुन मोठया प्रमाणावर शासनाचे करोडो रुपयांचे आर्थिक नुकसान केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मे. सुप्रीम इन्फ्रा. कंपनीविरुध्द व त्यांना मदत करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२), (३), (४) व (५) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत ठाणे भिवंडी वळण रस्त्यावरील माणकोली व राजणोली येथील उड्डाणपुलाच्या बांधकामाचा कार्यादेश दिनांक १०.०५.२०१३ रोजी देऊन काम पूर्ण करण्याकरिता २१ महिन्यांची मुदत देण्यात आली होती. सदर निविदेतील शर्तीनुसार ३+३ वाहिन्यांचे पुल व दोन्ही बाजूस प्रत्येकी ७ मी. रुंदीचे सेवा रस्ते व स्लिप रस्ते यांचे बांधकाम करणे अंतर्भूत होते. सदर काम राष्ट्रीय महामार्ग ६० मी. रस्त्यांच्या रुंदीत पूर्ण करावयाचे होते. तथापि, सदर कामास परवानगी देतांना भूपृष्ठ मंत्रालयाने ३+३ ऐवजी ४+४ वाहिन्यांचे उड्डाणपूल बांधण्याचे निर्देश दिले त्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूस ५ मी. रुदीचे अतिरिक्त भूसंपादन करणे आवश्यक ठरले. तसेच या भागात असलेल्या विविध सेवा वाहिन्या यांचे स्थलांतर करणे तसेच रस्त्यावर असलेल्या मोठया प्रमाणावरील अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे एकाचवेळी काम करणे शक्य नसणे इ. कारणामुळे उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण करण्यास अपेक्षित कालावधीपेक्षा अधिक

कालावधी लागत आहे. सदर उड्डाणपुलाच्या कामाची गुणवत्ता समाधानकारक असून याची पडताळणी वेळोवेळी दक्षता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत घेण्यात आली आहे.

माणकोली येथील उड्डाणपुलाच्या शेजारचे सेवा व स्लीप रस्त्याचे काम पूर्ण झाले असून सदर उड्डाणपुलाचे काम ७०% पूर्ण झाले असून सदर पुलाच्या चार वाहिन्याचे काम माहे डिसेंबर, २०१६ अखेर पूर्ण करुन तो वाहतुकीसाठी खुला करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच राजणोली येथील सेवा व स्लिप रस्त्याचे डाव्या बाजूचे काम पूर्ण झाले असून उजव्या बाजूचे काम प्रगतीपथावर आहे. सदर पुलाच्या चार वाहिन्यांचे काम माहे मे, २०१७ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजित असून दोन्ही दिशेकडील वाहतूक सोडून उर्वरीत चार वाहिन्यांचे काम माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नियोजित आहे.

----------------

## कर्जत (जि. रायगड) तालुक्यातील कोठींबे, मेचकरवाडी रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(६२) * ६९८९९ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि. रायगड) तालुक्यातील कोठींबे, मेचकरवाडी रस्त्याची अतिशय दयनिय व धोकादायक अवस्था झाली असल्याने या मार्गावरील एस.टी.ची वाहतूक बंद करण्याचा निर्णय एस.टी महामंडळाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मार्गावरील एस.टी मार्गावर धामणी, आंबिवली मेचकरवाडी व कर्जत गावांतील गावकऱ्यांची एस.टी वाहतूक बंद झाल्यास तेथील जनतेची मोठया प्रमाणात गैरसोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने तीन महिन्यापूर्वी ५० लाख इतका निधी खर्च करुनही दुरुस्तीचे काम चांगल्याप्रतीचे न करता त्यात मोठया प्रमाणात गैरव्यवहार केल्याची तक्रार गावकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची तत्काळ दुरुस्ती करण्याबाबत व रस्त्याच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

प्रश्नांकित रस्त्यावर कोठींबे ते धामणी पर्यत एस.टी. वाहतूक सुरु आहे. धामणी ते मेचकरवाडी या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम प्रगतीत असल्याने तात्पुरत्या स्वरुपात एस.टी. वाहतूक बंद करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोताळा (जि. बुलडाणा) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खरीप हंगामातील प्रलंबीत अनुदानाबाबत

**(६३) * ७०२०९ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोताळा (जि. बुलडाणा) तालुक्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगाम सन २०१५-१६ चे सुमारे रुपये १ कोटीचे अनुदान अद्यापही प्रलंबीत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती शेतकऱ्यांना अनुदान त्वरीत अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) याबाबत विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडून विहित नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात येत आहे. सुधारीत प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर मदत वितरणाबाबतची कार्यवाही करण्यात येईल

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील शिरवळ-बारामती चौपदरीकरणाचे काम सहा वर्षापासून बंद असल्याबाबत

**(६४) * ७०७२३ श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील शिरवळ-बारामती चौपदरीकरणाचे काम सहा वर्षापासून बंद असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भादे, अंदोरी व लोणंद एमआयडीसीतील असलेला हा रस्ता अत्यंत खराब व धोकादायक झाला असल्यामुळे या हद्दीत वारंवार अपघात होत असल्यामुळे या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम जलद गतीने चालू करावे अशी मागणी येथील परिसरातील नागरीक व वाहनचालकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम जलद गतीने करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यात येत असून, उपलब्ध जागेत त्वरीत काम हाती घेऊन, उर्वरित रस्ता रस्ते वाहतूकीसाठी सुरक्षित स्तरावर ठेवण्याच्या सूचना उद्योजकास देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील छावणी परिसरात आठवडी बाजारात गाय व बैलांचा झालेला मृत्यु

**(६५) * ७१७६४ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील छावणी परिसरात आठवडी बाजारात अधिकारी व ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे आठवडी बाजारासाठी आणलेल्या २३ गायी व

बैलांचा मृत्यु झाला व ३० जनावरे अत्यवस्थ असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छावणी परिषदेने जनावरांची देखभाल करण्यासाठी बांधलेल्या गोठ्यालगतच जनावरांचा कत्तलखाना असून या कत्तलखान्यात जनावरांची कत्तल केली जाते अशी तक्रार असूनही ठेकेदार व छावणी परिषदेच्या अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती दोषी व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) छावणी परिषदेमधील कत्तलखाना दिनांक १८.३.२०१६ पासून बंद असल्यामुळे अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उदभवत नाही. तथापि, सदर प्रकरणी पोलीस स्टेशन छावणी, औरंगाबाद येथे गु. र. नं.३६९/२०१६ कलम ९.११ (च) (झ) (ज) प्राण्यांना क्रुरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम,१९६० सह, प्राणी रक्षणे अधिनियमाचे कलम ५(ब), सह ४२९, ३४ भा.दं.वि. प्रमाणे संबंधीत ठेकेदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीसांमार्फत चालु आहे.

(५) प्रश्न उद्‌वभवत नाही.

-----------------

## वाडा (जि.पालघर) येथील वैतरणा, तानसा, पिंजाळ या नद्यांवरील रेल्वे पूलांना वाळू उपसामुळे धोका निर्माण झाल्याबाबत

**(६६) * ६५७२९ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) येथील वैतरणा, तानसा, पिंजाळ आदि नद्यांवरील रेल्वे पूलाच्या परिसरात मागील अनेक वर्षापासून राजरोसपणे बेसुमार रेती उपशामुळे वैतरणा नदीवरील पूलाला धोका निर्माण झाला असल्याचे पश्चिम रेल्वेने २०१२ पासून राज्य शासनाकडे लेखी पत्राद्वारे या वाळू उपशावर कायमस्वरूपी बंदी आणण्याची मागणी केली असून वाळू उपशावरील निर्बंधाचे आदेश मा.उच्च न्यायालयाकडून देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैतरणा, तानसा, पिंजाळ आदि नद्यांमधून महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी संगनमत करुन अवैध रेती उपसा चालू असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अलिकडेच पुन्हा दिनांक ६ जून २०१६ रोजी स्मरणपत्र पाठवून वैतरणा आणि सफाळे ९२ आणि ९३ क्रमाकांचा पूल अवैध वाळू उपशामुळे धोकादायक झाला असल्याचे पश्चिम रेल्वेचे मुख्य अभियंता के.सी.स्वामी यांनी प्रधान सचिव, महसूल विभाग यांना पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, वैतरणा पुलाजवळ होत असलेल्या वाळू उपशामुळे पुलाला धोका निर्माण झाल्याने राज्य शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे सेक्शन २० अंतर्गत १९८९ नुसार प्रधान सचिव, महसूल व जिल्हा प्रशासनाला दिनांक ४ जून, २०१६ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने वाळु उपशामुळे पुलाला धोका निर्माण होऊन अपघात होऊ नये म्हणून वाळू उपसा करणा-यांवर व त्यांना मदत करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) व (४) पश्चिम रेल्वेचे मुख्य अभियंता यांच्याकडून दि. ६ जून, २०१६ रोजीचे पत्र प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, त्यांच्याकडून दि. ०४/०६/२०१६ च्या पत्रान्वये यासंदर्भात रेल्वे अधिनियम, १९८९ च्या कलम २० खालील नोटीस प्राप्त झाली होती.

(५) मुख्य सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडे यासंदर्भात दि. २०.८.२०१६ रोजी प्रधान सचिव (महसूल), विभागीय आयुक्त कोकण विभाग, जिल्हाधिकारी

व पोलीस अधिक्षक पालघर, चिफ ब्रीज इंजिनियर (पश्चिम रेल्वे) यांची बैठक आयोजित करुन सदर बैठकीत उक्त रेल्वे पुलाजवळील रेतीचे अवैध उत्खनन थांबविण्याबाबत विविध उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, जिल्हा प्रशासनाला व इतर संबंधितांना त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयातील औद्योगिक वसाहतीमधील गोदामामध्ये बनावट खताचा साठा जप्त केल्याबाबत

**(६७) * ६५७७५ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील औद्योगिक वसाहतीमधील पचांगे बंधु यांच्या गोदामामध्ये बनावट खते, अवैध पिक संवर्धके व १९:१९:१९ विद्राव्य खतांचा साठा कृषी विभागाने दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करून अवैध रित्या बनावट खतांचा साठा केलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) होय. एम.आय.डी.सी. अकोला परिसरात अवैध कृषी उत्पादन संदर्भात पोलिस स्टेशन एम.आय.डी.सी.- २ अकोला यांच्या पत्रान्वये कृषी विभागास मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने श्री.गजानन सखाराम पाचंगे एम.आय.डी.सी. फेज-३ मधील फ्लॉट नं. एन-१३९ व श्री. रमेश सखाराम पाचंगे यांचे एम.आय.डी.सी. फेज-४ मधील फ्लॉट नं. एम-२२/२ येथे त्यांच्या गोडाऊन मध्ये कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय भरारी पथकाने धाड टाकून दि. ९ व १० ऑगस्ट, २०१६ रोजी तपासणी केली. सदर तपासणीत गोडाऊन मध्ये पिक वाढ संजीवके, विद्राव्य खते व किटकनाशके अवैधरित्या पॅकिंग साठवणूक व विक्री करत असल्याचे आढळले. सदर अवैध कृषी निविष्ठांच्या साठयाचा पोलिसासमक्ष पंचनामा करण्यात आलेला आहे. श्री. रमेश सखाराम पाचंगे प्रो.प्रा.एस.आर.पी. ॲग्रो

प्रॉडक्ट यांचे विरुध्द एफ.आर.आय. क्र. ६२ दि. १०.०८.२०१६ व श्री. गजानन सखाराम पाचंगे प्रो. प्रा. एस.आर.पी. ॲग्रो प्रॉडक्ट यांचे विरुध्द एफ.आर.आय. क्र. ६३, दि. १०.०८.२०१६ अन्वये किटकनाशक अधिनियम १९६८, नियम १९७१ व किटकनाशक आदेश १९८६ तसेच खत नियंत्रण आदेश १९८५ व जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ मधील तरतुदीचे उल्लंघन बाबत पोलिस स्टेशन, एम.आय.डी.सी. फेज-२ अकोला येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत प्रकरण पोलिस तपासत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गाची मोठया प्रमाणात झालेली दुरवस्था

**(६८) * ६६०३० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई - गोवा महामार्गाची मोठया प्रमाणात झालेली दुरावस्था, ठिकठिकाणी पडलेले खडडे व यामुळे वाढलेले अपघातांनाचे प्रमाण यात अनेकांचे जात असलेले बळी, ही सर्व कारणे लक्षात घेऊन शासनाने महामार्ग प्राधिकरण, ठेकेदारांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करावेत अशी मागणी पळस्पा इंदापूर राष्ट्रीय महामार्ग रुंदीकरण प्रकल्पग्रस्त कृती समितीने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) मुंबई - गोवा महामार्गाच्या पळस्पे ते इंदापूर या ८२ कि.मी. अंराच्या टप्प्याच्या चौपदरीकरणाच्या कामास इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि. व महावीर इन्फ्रास्ट्रक्चरर्स प्रा.लि. या दोन्ही कंत्राटदार कंपन्या अपयशी ठरल्या असून, त्यांना चार ते पाच वेळा

मुदतवाढ देवूनही गेल्या पाच वर्षापासून चौपदीकरणाचे काम पूर्ण केलेले नसल्याची बाब दिनांक २९ ऑगस्ट, २०१६ रोजी जिल्हाधिकारी रायगड यांच्या कार्यालयाच्या सभागृहात महामार्गाविषयी झालेल्या बैठकीत निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, काम पूर्ण न झाल्याने महामार्गाच्या टप्प्यात यापूढे होणारे अपघात आणि त्यातील मानवी हाणीस राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणास जबाबदार धरुन पुढील कारवाई करण्याचा इशारा रायगडचे पालकमंत्र्यांनी वरील बैठकीत गोवा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणांचे मुख्य कार्यकारी अभियंता यांना दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मुंबई गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी संपादीत करावयाचा जमिनीचा मोबदला आदी जाहीर करुन तो संबधित शेतक-यांना अदा करावा तसेच जमीनी १०० फुटा ऐवजी ५० फुटावर नीस मारुन भूधारकांना जमीनीची हदद निश्चीतीमध्ये सुस्पष्टता आणावी अशी मागणी बिबवणे पिंगुळीतील शेतक-यांनी महामार्ग विभागातील कार्यकारी अभियंता यांचेकडे माहे ऑक्टोबर २०१६ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या नुसार शासनाने दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ अखेर झालेल्या अपघाताच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली असून महामार्गाचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

अर्जदार श्री.प्रितम सागने व श्री.मार्क सेल्वीन यांनी दिनांक २३.०८.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मुंबई-गोवा महामार्गाच्या झालेल्या दुरवस्थेबाबत जबाबदार असणा-या कंन्स्ट्रक्शन कंपनीविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी असा तक्रार अर्ज पेण पोलीस ठाणे, रायगड यांना प्राप्त झाला असल्याचे अपर पोलीस महासंचालक (वा.), महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी कळविले आहे.

(२) खरे आहे.

(३) ही बाब राज्य शासनाच्या अखत्यारीत नाही.

(४) माहे ६/२०१५ मध्ये पिंगुळी ता.कुडाळ मधील ग्रामस्थाकडून ६०.०० मीटर ऐवजी ४५.०० मीटर रुंदीने भूसंपादन करावे व जमिनीचा मोबदला मिळावा अशा स्वरुपाची निवेदने प्राप्त झाली आहे.

(५) इंदापूर ते झाराप राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणासाठी गावाबाहेर ६० मी. व गावामध्ये ४५ मी. साठी भूसंपादन करण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने घेतलेला आहे. त्यामध्ये बदल करण्याची बाब राज्य शासनाच्या अखत्यारीत नाही.
(६) व (७) उपप्रश्न क्र. १ मधील तक्रार अर्जात मागणी केल्यानुसार मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होत नाही असे अपर पोलीस महासंचालक (वा.), महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी कळविले आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे असलेल्या पनवेल ते इंदापूर ह्या ८४.०० कि.मी. महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम खाजगीकरणामधून मे. सुप्रिम पनवेल इंदापूर टोलवेज प्रा. लि. या सवलतकारामार्फत दि.१९.१२.२०११ पासून प्रगतीत असून, कर्नाळा पक्षी अभयारण्य क्षेत्रामधील महामार्ग रुंदीकरणासाठी पर्यावरण व वन विभागाची मंजुरी, जलवाहीन्यांचे स्थलांतर तसेच मौ. काराव, नागोठणे व कोलेटी येथील भूसंपादन या बाबींना विलंब झाल्याने तसेच, उद्योजकाकडून दिरंगाई झाल्याने कामास विलंब झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

सद्यस्थितीत शासनाच्या सहकार्याने सर्व बाबी मार्गी लागल्या असून प्रकल्प पुन:जिवीत करण्यासाठी केंद्र शासनाकडून प्रकल्पाला निधी (One time fund infusion) उपलब्ध करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली असून पळस्पे ते इंदापूर ह्या ८४ कि.मी. राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण मार्च २०१८ पर्यंत होण्याचे नियोजित असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

-----------------

## पालघर जिल्हयातील नद्यांवरील पूल नादुरुस्त व मोडकळीस आल्याबाबत

**(६९) * ६६८४० श्री.अमित घोडा (पालघर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील सुर्या, वैतरणा, तानसा, देहजें, पिजांळ, दमणगंगा या नदयांवरील आणि इतर नदयांवरील अनेक पूल मोडकळीस आले असून धोकादायक स्थितीत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मोर्यापाडा व दसकोड (ता.जव्हार, जि.पालघर) नदीवरील धोकादायक पूल गेली २० वर्षापासून नादुरुस्त व मोडकळीस आल्यामुळे विद्यार्थी व नागरिकांना या धोकादायक पूलावरुन प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जीर्ण होऊन मोडकळीस आलेल्या पूलाचे दुरुस्तीचे काम होण्याकरिता तेथील ग्रामस्थांनी सन १९९६ पासून सतत सार्वजनिक बांधकाम विभाग,जव्हार यांच्याकडे लेखी तक्रारी देऊनही अदयाप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनामार्फत उक्त पुलांबाबत पाहणी व चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पालघर जिल्हयातील धोकादायक पुलांची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
सदर पुल जुने व कमकुवत झाले असल्याने दुरुस्ती व पुनर्बांधणी आवश्यक आहे.
(२) व (३) सदरचा पुल जुना लोखंडी प्रकारचा फक्त पादचारी वाहतूकीकरीता बांधलेला साकव आहे.
हा रस्ता स्थानिक क्षेत्राकडील ग्रा.मा. ४० असा आहे. या रस्त्यावर प्रश्नांकीत पुलाचे ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे मार्च-२०१६ च्या अर्थसंकल्पात पुलाचे काम मंजूर असून हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) पालघर जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील पुलांची पाहणी करण्यात आली आहे.
(५) पालघर जिल्हयातील पुलांच्या दुरुस्ती व पुनर्बांधणीची कामे मंजुरी, निधी, निकष व प्राधान्याने हाती घेण्याचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील भीमा व मुला नदीवरील पूल, पुणे ते पौड आणि मुळशी रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघातात झालेली वाढ

**(७०) * ७१७४० श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चास (ता.खेड, जि.पुणे) येथील भीमा नदीवर असलेल्या चास-कडूस दरम्यानचा पुल वाहतुकीस धोकादायक झाला असून जागोजागी कौन्क्रीट निघाले असल्याने सदर पुलाची तत्काळ दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुणे ते पौड आणि मुळशी मार्गे तमानी कडे जाण्याच्या रस्त्याला खड्डे पडले असून रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघातामध्ये वाहन पलटी होऊन अनेक जन जखमी होण्याच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली असून याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याची बाब माहे, ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्यामधील मालेफाटा ते शेदानी भागाला जोडणारा संभवे येथील मुला नदीवरील दुरवस्थेत असलेल्या पुलाची दुरुस्ती न झाल्यास हा पूल कोसळून मोठी दुर्घटना होऊन ३० ते ३५ गावांचा संपर्क तुटून नागरीकांची गैरसोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पुणे ते पौड मुख्य रस्त्याची दुरुस्ती व भीमा नदीवरील पुलाची तत्काळ दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही. पूल सुरक्षित आहे. पूलाच्या वेअरींग कोटला काही ठिकाणी खड्डे पडले होते. ते आता भरण्यात आले आहेत. पूलावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(२) नाही.

या रस्त्यावरील अपघातांच्या संख्येत वाढ झाल्याची नोंद पोलीस दप्तरी नाही. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे डांबरमिश्रित खडीने भरण्याचे काम प्रगतीत आहे. रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(३) नाही अशी बाब नाही

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सार्वजनिक बांधकाम विभागाने ई निविदेत केलेला गैरव्यवहार**

**(७१) * ६५१७६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मंत्रालय, आमदार निवास आणि इतर सरकारी इमारतीतील विद्युत दुरुस्त्यांसाठी दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजी काढलेल्या विविध प्रकारच्या ११२ ई निविदासाठी नोटीस काढण्यात येऊन निवेदेतील ९९ क्रमांकाच्या १ कोटी १६ लाख किंमतीच्या निविदेसाठी ठेकेदारांना ९ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर, २०१५ इतका कालावधी देण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून आपल्या मर्जीतल्या कंत्राटदाराला आपले म्हणणे सादर करता यावे याकरिता "सुपर हॅश" या वेळापत्रकाला छेद देणारी प्रक्रिया ९ डिसेंबर, २०१५ च्या रात्री १० वाजून ४७ मिनटांनी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, "सुपर हॅश" प्रकियेनंतर १५ ते २० मिनीटाच्या अवधीत मर्जीतील तीन कंत्राटदारांनी अधिकाऱ्यांच्या संगणकावरुनच आपले म्हणणे अपलोड केल्यानंतर निविदेची मुदत संपविण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी मुख्य सचिव, प्रधान सचिव यांच्यासह सायबरसेल, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने "सुपर हॅश" या वेळापत्रकाला छेद देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४), (५) व (६) या प्रकरणी मुख्य सचिव, प्रधान सचिव (सा.बां) व सचिव (बांधकामे) यांच्याकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारींची सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई एंट्री पॉइंट वरुन सुरु असलेला इंधन उपकर बंद करण्याबाबत

**(७२) * ६७६५४ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईत रस्ते विकास मंडळाने १०६५.२५ कोटी रुपये खर्च करुन ३८ उड्डाणपूले बांधली असून पूलांचा खर्च वसूल करण्यासाठी टोल, जाहिरातीवर आणि इंधनावर उपकाराच्या पेट्रोलवर १ टक्का आणि डिझेलवर ३ टक्के आकरुन सदरचा झालेला खर्च वसूल करण्याचा निर्णय झाल्यानंतर मुंबई एंट्री पॉइंट देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९९-२००० पासून सुरु झालेल्या या टोलवसूलीतून ठेकेदाराला माहे ऑक्टोबर, २०१० मध्येच १०५८.६६ कोटी रुपये वसूल झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईत इंधनावर आकारण्यात येणाऱ्या उपकराच्या माध्यमातून राज्य शासनाने ८२२ कोटींची वसूल केल्याची माहिती

निदर्शनास आल्याने उड्डाणपुल बांधणी खर्च या आधीच वसूल झाल्याने हा उपकर बंद करण्याची शिफारस भारताचे नियंत्रक आणि महालेखपरीक्षकाने (कॅग) ने राज्य सरकारला केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई एंट्री पॉइंट वरुन सुरु असलेला इंधन उपकर कर बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

मुंबई, उपनगरे, ठाणे व नवी मुंबई परिसरात बांधण्यात आलेल्या विविध उड्डाणपूल व इतर कामांवर एकूण रु. १२५८.९९ कोटी इतका खर्च झालेला आहे. पथकरातील तूट भरुन काढण्यासाठी मुंबई, ठाणे व नवी मुंबई परिसरातील पेट्रोलवर १ टक्का व डिझेलवर ३ टक्के उपकर लावण्यात आला आहे.

(२) नाही.

पथकरातून ऑक्टोबर २०१० पर्यंत महामंडळास रु. १०६९.२८ कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली आहे. तदनंतर सिक्युरीटायझेशन पद्वतीने रु.२१०० कोटी एवढे एकरकमी अग्रिम घेउन उद्योजकास दिनांक १९.११.२०२६ पर्यंत पथकर वसूलीचे कंत्राट देण्यात आले आहे.

(३) होय.

(४), (५) व (६) याबाबतचा महामंडळाचा स्पष्टीकरणात्मक अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यानुसार या प्रकल्पावरील खर्चाची वसुली अद्याप बाकी असल्याने इंधन उपकर सुरु ठेवणे आवश्यक असल्याचे नमुद केले आहे.

-----------------

## पुणे-मुंबई महामार्गावरील टोल वसुलीचे उद्दिष्ट अडीच वर्षे आधीच पूर्ण झाल्याबाबत

**(७३) * ६७३४३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे - मुंबई महामार्गावरील (एक्सप्रेसवे) टोल वसुलीचे उद्दिष्ट अडीच वर्षे आधीच पूर्ण झाले असल्याची माहिती माहे ऑक्टोबर २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गावरील टोल वसुलीचे काम तातडीने थांबून कंत्राटातील अटी-शर्तीनुसार पुढील दोन वर्ष केवळ रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी कंत्राटदार कंपनीवर देण्यात यावी अशी मागणी सजग नागरिक मंचाने मा.मुख्यमंत्र्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही.

(२) होय.

(३) चौकशी करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील भिमा नदी व सातारा जिल्हयातील कृष्णा नदीवरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(७४) * ६७२७१ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील पुणे-नगर महामार्गावरील कोरेगाव भिमा तालुका शिरुर येथील भिमानदीवरील ब्रिटीशकालीन १०२ वर्षाच्या दगडी पुलावर खड्डे पडल्याने व या पुलाचा भराव खचलेला असल्याने हा पूल वाहतूकीस धोकादायक झाला असल्याने या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट होऊन आवश्यक ती दुरुस्ती व्हावी अशी मागणी ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता जागतिक बँक प्रकल्प यांच्याकडे दिनांक ४ ऑगस्ट २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सातारा जिल्हयातील सातारा-पंढरपूर राज्य मार्गादरम्यान क्षेत्र व संगम माहुलीच्या मध्यावर असलेल्या कृष्णा नदीवरील ब्रिटीशकालीन विलिंग्डन अर्थात कृष्णा पुलाने शंभरी पार केली असल्याने व पुलावरील डागडुजीमुळे पुलाच्या मजबुतीवर परिणाम होऊन पुलाच्या कठड्यांची उंची कमी झाली असल्याने कोणत्याही क्षणी दुर्घटना होण्याचा संभव निर्माण झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील दिघची येथील माण नदीवरचा पुलाच्या खालून होणारा वाळूचा उपसा, विहिरीसाठी होणारे ब्लास्टिंग, वाढत्या वाहनाच्या संख्येमुळे ३७ वर्ष जुना पुल धोकादायक असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने माण, भिमा व कृष्णा नदीवरील पूलाची मजबूती टिकविण्यासाठी पुलाची तातडीने दुरुस्ती व स्ट्रक्चरल ऑडीट करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) खरे नाही.

पूलाच्या जोडरस्त्याचा भराव काही लांबीत क्षतिग्रस्त झाला होता तो आता दुरुस्त करण्यात आला आहे. सदयस्थितीत सदर पुल वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.

पूलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) नाही.

(३) नाही.

पूलाच्या स्तंभ क्र.१, २ व ३ भोवती वाळू उपश्यामुळे काही प्रमाणात स्कॉअरींग झाले आहे.

(४), (५) व (६) प्रश्नांकित पूलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेण्याचे नियोजन आहे. निष्कर्ष प्राप्त झाल्यावर प्राप्त निष्कर्षानुसार कार्यवाही करण्यात येईल. सद्यस्थितीत पूलांवरुन वहातूक सुरळीतपणे चालू आहे.

-----------------

## पारनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील कुकडी नदीवरील झुलता पूल धोकादायक झाल्याबाबत

**(७५) * ६६४५७ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील निघोज येथील कुकडी नदीवरील रांजणखळगे कुंड पर्यटन स्थळी बांधण्यात आलेल्या झुलत्या पुलाची अवस्था अतिशय दयनीय झाली असून माहे जुलै, २०१६ मध्ये कुकडी नदीला आलेल्या ३५ हजार क्यूसेकच्या पूराच्या पाण्याच्या दाबाने पूल रहदारीसाठी धोकादायक झाला असून कधीही कोसळून मोठया प्रमाणात जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता असल्याची बाब दिनांक ९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०११ साली बांधलेल्या पूलाचे सध्यास्थितीत नटबोल्ड तुटले असून दुभंगलेल्या अवस्थेत एका लोखंडी पट्टीवर तग धरुन असल्याने सदरहू पूल वाहतूकीस धोकादायक झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सदरहू पूलाची तत्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) प्रश्नांकित पूल शिरुर तालुक्यातील टाकळीहाजी (निघोजकुंड) या पर्यटन स्थळी २०१३ मध्ये बांधण्यात आला आहे. जुलै २०१६ मध्ये कुकडी नदीला आलेल्या पुरामुळे पूल क्षतिग्रस्त झाला होता. सदयस्थितीत पूलाची तात्पुरत्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. पूल भाविक व पर्यटकांच्या वाहतुकीसाठी सुरक्षित असून वापरात आहे.

(४) व (५) पूलाच्या कायमस्वरुपी दुरुस्तीचे काम क वर्ग पर्यटना अंतर्गत जिल्हा नियोजन समिती यांच्याकडून मंजूरी निधी, निकष व प्राथाम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## वाशिम जिल्हयातील बागायतदारांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(७६) * ६८०७० श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयात डाळींब लागवडीसाठी देण्यात येणारे अनुदान मागील तीन वर्षाचा कालावधी होवूनही अद्याप न मिळाल्याने शेतकऱ्यांना दुष्काळाबरोबरच आर्थिक झळ सहन करुन बागा जतन करावे लागत असल्याचे माहे मे, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिल्हयात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्यामुळे केळी व डाळींब या फळबागांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असल्याचेही माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना डाळींबाचे अनुदान व नुकसान झालेल्या फळबागांचे पंचनामे करुन आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मागील ३ वर्षापासून वाशिम जिल्हयामध्ये डाळींब पिकाचे लागवडीसाठीचे अनुदान प्रलंबित नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी व रायगड या दोन जिल्हयाला जोडणाऱ्या विन्हेरे रस्त्याची झालेली दुरवस्था

**(७७) * ७०९६४ श्री.संजय कदम (दापोली), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी व रायगड या दोन जिल्ह्याला जोडणाऱ्या कशेडी घाटात सतत दरडी कोसळत असून याला पर्यायी मार्ग म्हणून वापरण्यात येणारा विन्हेरे रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पर्यायी मार्गावर राजरोसपणे सुरु असणाऱ्या वाळू वाहतुकीमूळे या मार्गावर खड्डे पडले असल्याने वाहनचालकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून या मार्गाच्या दुरुस्तीसाठी शासनाने लाखो रुपये खर्च करुनही या मार्गाची दुरवस्था झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कशेडी मार्गावर दरड कोसळल्यास पर्यायी असलेल्या मार्गाची तात्काळ दुरुस्ती करावी अशी मागणी तेथील ग्रामस्थांकडून वारंवार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) प्रश्नांकीत रस्त्यावर पावसाळयात वाळूच्या अवजड वाहतुकीमुळे डांबरी पृष्ठभागाला खड्डे पडलेले आहे हे खरे आहे.

सद्यस्थितीत सदर खड्डे, खडी व डांबराने भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) शासनाच्या विविध योजनांतर्गत सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम मंजुरी, निधी, निकष व प्राथाम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मेहकर (जि. बुलढाणा) तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(७८) * ६६६११ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि. बुलढाणा) तालुक्यातील बागायती, फळबागा, बहुवार्षिक पिकांचे माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०१५ मध्ये पावसाचे प्रमाण कमी झाल्याने नुकसान झाल्याचा अहवाल मेहकर तहसिल कार्यालयाकडून वरिष्ठांकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये पाठवूनही अद्यापपर्यंत या शेतक-यांना नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) अमरावती व नागपूर विभागातील बाधीत शेतक-यांना अर्थसहाय्य देण्याची बाब न्यायप्रविष्ठ असून त्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या प्रमाणात झालेली वाढ**

**(७९) * ६५२७८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारकडून राबविण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांमुळे वर्षभरात राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्यांमध्ये लक्षणीय घट झाल्याचे शासनाकडून निदर्शनास आणले जात आहे परंतु माहे जानेवारी ते सप्टेंबर, २०१६ या कालावधीमध्ये पुणे विभागात ५९, नागपूर विभागात २५५, नाशिक विभागात

३७०, अमरावती विभागात ८०२ व औरंगाबाद विभागात ८३६ अशाप्रकारे या विभागात कर्जामुळे जवळपास २३२२ शेतक-यांनी आत्महत्या केली असल्याची माहिती दिनांक २० ऑक्टोंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी शेतक-यांच्या आत्महत्येमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शासनाकडून विविध उपाययोजना व उपक्रम राबविले जात आहेत. त्याचप्रमाणे उस्मानाबाद आणि यवतमाळ या जिल्ह्यामध्ये बळीराजा चेतना अभियान पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहे व कै. वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनची पुनर्रचना करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील खाडीतील बेकायदा वाळू उपसामुळे रेल्वे पुल व रेल्वेमार्गाला धोका निर्माण झाल्याबाबत

**(८०) * ६५३६१ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील हायवे-दिवेलगतच्या खाडीत बार्ज व सक्शन पंपाव्दारे अनधिकृतरित्या रेतीचे उत्खनन होत असून याप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल दक्षता पथकाने टाकलेल्या धाडीत २० ब्रास रेतीसह रुपये १

कोटी ८० लाख किमतीचे ६ बार्ज व ६ सक्शन पंप जप्त केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण, डोंबिवली, वेहळे, पिंपळास, मुंब्रा, कशेळी, गायमुख खाडीच्या पात्रात सक्शन पंप किंवा यांत्रिकी मशिनने रेती उत्खनन करण्यास बंदी असतांनाही राजरोसपणे अनधिकृतपणे रेती उत्खनन सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ठाणे, मुंब्रा, दिवा, कोपर (जि.ठाणे) या खाडी किना-यालगत होणा-या बेकायदा वाळू उपशामुळे रेल्वे पुल, रेल्वेमार्गाला धोका निर्माण झालेला आहे आणि पर्यावरणाचा -हास होत असल्याने सबंधितांवर कारवाई करण्याची लोकप्रतिनिधींनी दि.०८ ऑगष्ट, २०१६ रोजी तसेच वारंवार मा.जिल्हाधिकारी,ठाणे यांचेकडे तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पुल कोसळल्यास मोठ्या प्रमाणात जीवितहानी होण्याची शक्यात असल्याने याबाबत रेल्वे प्रशासनाने ठाणे महापालिका व जिल्हाधिका-यांना गेल्या दोन वर्षापासून वारंवार पत्र पाठवूनही रेती उपसा करणाऱ्यांवर शासनामार्फत कोणतीच कारवाई करण्यात येत नसल्याचे दि. ५ ऑगस्टर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफीयांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) सदर ठिकाणी रेतीच्या अवैध उत्खननाची काही प्रकरणे निदर्शनास आलेली आहेत.

(३) लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी ठाणे यांना दिनांक ६.८.२०१६ रोजी अशा आशयाचे निवेदन दिले आहे.

(४) सहायक मंडळ अभियंता (रे.प.) मध्य रेल्वे ठाणे यांनी दि.०८/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये उपजिल्हाधिकारी ठाणे यांना, मुंब्रा ते दिवा या स्थानकांमधील रेल्वेच्या कि.मी. ३८/५-७ या क्षेत्राच्या पुर्वेकडे, रेल्वे मार्गासाठी केलेल्या भरावाजवळ होत असलेल्या अवैध उत्खननामुळे रेल्वे मार्गास धोका निर्माण होत असल्याबाबत कळविल्याचे निदर्शनास आले आहे.

(५) अपर जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे यासंदर्भात दि.१०/०८/२०१६ रोजी रेल्वे, महसूल, पोलीस, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, तटरक्षक दल व प्रादेशिक परिवहन

विभागातील अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजीत करून सदर बैठकीत मुंब्रा-कोपर खाडीलगत होत असलेल्या अवैध रेती उत्खननावर प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला असून संबंधित विभागांना त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

ठाणे जिल्ह्यातील खाडीपात्रातील रेतीच्या अवैध उत्खननाबाबत महसूल विभागामार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात आली असून, माहे एप्रिल, २०१६ ते ऑक्टोंबर, २०१६ या कालावधीत एकूण १०५ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत व उत्खननासाठी वापरण्यात आलेली यंत्रसामग्री जप्त करण्यात आली आहे. तसेच अवैध वाहतूक करणाऱ्या १९२१ वाहनांकडून रुपये ५.१६ कोटी इतकी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**मुरबाड (जि.ठाणे) येथील साखरे गावाच्या हद्दीत बेकायदेशीर माती उत्खनन करुन आरसीसी बांधकाम करण्यात आल्याबाबत**

**(८१) * ६६७३९ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) येथील साखरे गावाच्या हदीतील १६ एकर म्हणजे सहा हेक्टरपेक्षा जास्त जागेमध्ये कोटयावधी रुपयांचे बेकायदेशीर माती उत्खनन करुन आरसीसी बांधकाम करण्यात आल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बांधकाम व माती उत्खनन करतांना ग्रामपंचायत व महसूल विभागाची कोणतीच परवानगी घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात ग्रामपंचायत उपसरपंच व नागरिकांनी दिनांक ६ एप्रिल २०१६ रोजी तहसिलदार, मुरबाड तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे तक्रार करुनही अदयाप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी व्यक्तीवर शासनाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) मौजे साखरे, ता. मुरबाड येथील स. नं. ४३ व ४४ मध्ये सुमारे ६३४ ब्रास माती व डबराचे अनधिकृत उत्खनन, तसेच २००० चौ. फुटाचे अनधिकृत आरसीसी बांधकाम केल्याचे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे.

(३) यासंदर्भात ग्रामपंचायत उपसरपंच व नागरिकांनी दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी तहसिलदार, मुरबाड तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे तक्रार केल्याचे दिसून आले नाही. तथापि, एका वृत्तपत्राच्या प्रतिनिधीने दिनांक ०३/०६/२०१६ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे सदर अवैध उत्खननाबाबत तक्रार केली आहे.

(४) व (५) तहसिलदार मुरबाड यांनी मौजे साखरे, ता. मुरबाड येथील स. नं. ४३ व ४४ मधील २००० चौ. फुटाच्या अनधिकृत आरसीसी बांधकामाबाबत दंडात्मक कारवाई करण्याचा प्रस्ताव अपर तहसिलदार कल्याण यांना पुढील कार्यवाहीस्तव पाठविला आहे. सदर ठिकाणच्या सुमारे ६३४ ब्रास माती व डबराचे अनधिकृत उत्खननाबाबत आवश्यक फेरतपासणी करुन नियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी ठाणे यांना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्य परिवहन महामंडळाने ट्रायमॅक्स कंपनीचा करार सुरूच ठेवल्याने झालेला गैरव्यवहार

**(८२) * ६५८१७ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाने २००९ साली प्रवाशांना तिकीट देण्यासाठी ५ वर्षांच्या करारावर वाहकांना ट्रायमॅक्स कंपनीचे इलेक्ट्रानिक मशिन देण्यात आले असून ५ वर्षांचा करार करताना एसटी प्रशासन आणि ट्रायमॅक्स कंपनीत झालेल्या करारानुसार वर्षाला ७५ कोटीपेक्षा अधिक तिकिटे विकली गेल्यास प्रत्येक तिकिटांमागे २१ पैसे दराने ट्रायमॅक्सला पैसे मिळणार होते तसेच ७५ कोटीपेक्षा कमी तिकिटे विकली गेल्यास भरपाई म्हणूनही एसटी प्रशासन ट्रायमॅक्सलाच पैसे देईल असे त्यात नमूद करण्यात आले होते हा करार करताना राज्य परिवहन महामंडळाने त्यांच्या नफ्याचा विचार केला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५ वर्षे पूर्ण झाल्यानंतरही राज्य परिवहन महामंडळाने ही सेवा पुढील २ वर्षासाठी आपल्या ताब्यात घेण्याऐवजी पुन्हा ट्रायमॅक्सला देण्याचा निर्णय घेतला यात तिकीटांमागे २१ पैसे हा दर वाढवून ३३ पैसे एवढा दर ठेवण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू संशयास्पद कराराबाबत एसटीच्या मुख्य सुरक्षा व दक्षता विभागाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत त्याची चौकशी करण्याची मागणी राज्य शासनाकडे केली असतानाही राज्य शासनाने आजमितीस ५ महिन्यांचा कालावधी लोटलेला असूनही त्याकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (1) राज्य परिवहन महामंडळाने सन 2008-09 मध्ये राबविलेल्या निविदा प्रक्रियेमधील निविदा अर्जामध्ये वार्षिक 75 कोटी पर्यंतच्या तिकीटांसाठी, 75 ते 90 कोटी पर्यंतच्या तिकिटांसाठी तसेच 90 कोटी पुढील तिकिटांसाठी निविदाकारांनी दर भरण्याची तरतूद करण्यात आली होती. महामंडळामार्फत वार्षिक अंदाजे 120 ते 125 कोटी तिकिट विक्री होत असल्याने किमान 75 कोटी तिकिट आश्वासीत करुन त्यानुसार तीन टप्प्यात निविदाकारांकडून दर मागविलेले होते. यामध्ये राज्य परिवहन महामंडळाने त्यांच्या नफ्याचा विचार केला नाही, असे म्हणता येणार नाही.

(2), (3) व (4) सदर प्रकल्पाचा 5 वर्ष कालावधी संपल्यानंतर दिलेल्या मुदतवाढीमध्ये प्रति तिकिटामागे 21 पैसे एवढा दर देण्यात आला आहे. महामंडळाने मे.ट्रायमॅक्स कंपनीच्या प्रकल्पास दिलेल्या मुदतवाढीबाबत मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालावर, सदर प्रकरणी राज्य परिवहन महामंडळाने संचालक मंडळस्तरावर विचार करुन आवश्यकतेनुसार महालेखापाल यांचेकडून विशेष लेखापरिक्षण करुन घेण्याबद्दल कळविण्यात येत आहे.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे ग्रामस्थांच्या मालमत्तेचे झालेले नुकसान

**(८३) * ६६८८४ श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यात चिंचणी, तारापूर, धाकटी डहाणू, घाचिया आगर, चिंचणी भाटीपाडा, सागरी महामार्ग येथील शिपाई नगर, शिपाई मोहल्ला येथे दिनांक २१ सप्टेंबर, २०१६ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेकडो घरात पाणी जाऊन ग्रामस्थांच्या मालमत्तेचे नुकसान होउन कोळंबी प्रकल्पाला मोठा फटका बसला तसेच चिंचणी धोबी तलावाच्या पूलावरुन एक मुलगा वाहून गेला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, पूरग्रस्तांना त्वरित आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) अतिवृष्टीमुळे शेतीपिकांची नुकसानभरपाई देण्यासाठी, झालेल्या नुकसानीची आकडेवारी क्षेत्रीय कार्यालयांकडून अचूक पंचनामे करुन मागविण्यात आली आहे. सदर माहिती संकलीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबचा निर्णय घेण्याची बाब प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठिबक व तुषार सिंचनाचे संच लावण्यास शेतकऱ्यांना मुदतवाढ देण्याबाबत

**(८४) * ६५१७७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठिबक व तुषार सिंचनासाठी कृषी विभागाकडून अनुक्रमे प्रति हेक्टर १८ हजार व ५७ हजार रुपयांचे अनुदान देण्यात येते त्याकरिता शेतकऱ्यांनी स्व:खर्चाने ठिबक व तुषार सिंचनाचे संच खरेदी करावे लागत असून त्यांचे प्रस्ताव कृषी विभागाच्या मंजुरीनंतर अनुदानासाठी शासनाकडे पाठविले जात होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वर्षापासून यामध्ये बदल करण्यात येऊन ठिबक व तुषार सिंचनासाठी ऑनलाईन अर्ज मागवून कृषी विभागाच्या मंजुरीनंतरच संच लावण्याची परवानगी देण्यात येते, तसेच या संदर्भात सप्टेंबर, २०१६ च्या शेवटच्या आठवडयात आयुक्त कृषी कार्यालयाने पत्रक काढून ज्या शेतकऱ्यांचे अर्ज अनुदानासाठी पात्र ठरले त्यानी आठ दिवसात संच लावावेत त्यानंतर संच लावणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदान मिळणार नसल्याचे सांगण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सप्टेंबर मध्ये खरिप हंगाम सुरु असून सर्वच शेतामध्ये पिकाची लागवड करण्यात आली असल्याने उभा पिकात ठिबक व तुषारचे संच लावल्यास पिकांची हानी होणार असल्याने खरिपाचे पीक कापणी झाल्यानंतर संच लावण्याची परवानगी दयावी त्याकरिता कृषी विभागाने तीन महिन्यांची मुदत दयावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली, असून याबाबत मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये मा.कृषी मंत्री यांना विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) तसेच चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांनी व मा. विरोधी पक्षनेता यांनी केलेल्या मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) ठिबक सिंचनसाठी प्रति हेक्टरी रु.१४,१०० ते ६०,००० मर्यादेत व तुषार सिंचनासाठी रु.१२,००० ते ५१,१२० या मर्यादेत अनुदान देण्यात येते. अनुदानासाठीचे प्रस्ताव तालुका कृषी अधिकारी यांचेकडून जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचेकडे मंजूरीसाठी पाठविण्यात येतात.

(२) पूर्वसंमती दिल्यानंतर सूक्ष्म सिंचन संच बसविण्यासाठी शेतकऱ्यांना १ महिन्याचा कालावधी देण्यात आला आहे.

(३), (४) व (५) ऑक्टोबर, २०१६ चे मा.विरोधी पक्ष नेता यांचे पत्र प्राप्त झाले आहे.

सूक्ष्म सिंचन संच बसविण्याच्या कालावधीमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अहमदनगर जिल्हयात शेतकऱ्यांच्या जनावरांना आधार देणाऱ्यासाठी शासनाकडून मंजूर झालेल्या अनुदानाचे वाटप झाले नसल्याबाबत**

**(८५) * ६६५६० श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात सन २०१५-१६ च्या चारा टंचाईच्या काळात शेतकऱ्यांच्या जनावरांना आधार देणाऱ्यासाठी शासनाकडून मंजूर झालेल्या १२ कोटी ७४ लाख रुपयांच्या अनुदानाचे वाटपच झालेले नाही अशी माहिती दिनांक ७ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदरहू अनुदान वाटप करण्यास निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत व शेतकऱ्यांना अनुदानाचे तात्काळ वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील कुळवंडी जांभुळवाडी येथे अतिवृष्टीमुळे दरड कोसळल्याबाबत**

**(८६) * ७०९७७ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील साताऱ्याला जोडणारा खेड-खोपी रस्ता या मार्गावरील कुळवंडी जांभुळवाडी येथे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे डोंगर कोसळून या दोन वाड्यामधील बारा घरांना धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वर्दळीच्या मार्गावर असलेल्या सातारा जिल्ह्यासह लोटे औद्योगिक क्षेत्राकडे जाणारा या महत्वाच्या मार्गावर डोंगर कोसळूनही सार्वजनिक विभागाच्या अधिकाऱ्यांनी या घटनेकडे जाणीव पुर्वक दुर्लक्ष केल्याने तेथील जनतेमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने भविष्यात मोठी दुर्घट्ना टाळण्यासाठी व डोंगराच्या पायथ्याशी संरक्षण भिंत व रस्त्याला मोरी टाकून पावसाचे पाणी अन्यत्र ठिकाणी कळविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) प्रश्नांकित रस्त्यावरील कि.मी.१०/१०० (कुळवंडी जांभुळवाडी) येथे सप्टेंबर २०१६ मध्ये अतिवृष्टीमुळे दरड कोसळली होती हे खरे आहे.

तथापि सदर कोसळलेली दरड तात्काळ बाजूला करुन तातडीने वाहतुक सुरळीत करण्यात आली.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) सदर ठिकाणी सरंक्षक भिंत व नवीन मोरी बांधण्याचे काम मंजूरी, निधी निकष व प्राधान्याने हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील दुष्काळी अनुदानात झालेला गैरव्यवहार

**(८७) * ६५३०४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील दुष्काळी अनुदानाकरीता सन २०१४-१५ आणि २०१५-१६ या आर्थिक वर्षात लाभार्थ्याच्या बनावट यादया तयार करुन सव्वा कोटी रुपयांचा अनुदानात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गैरव्यवहार केला असल्याची माहिती दिनांक २० ऑक्टोंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी तीन तलाठी व एक अव्वल कारकून यांना निलंबीत करण्यात आले आहे. तसेच या प्रकरणातील जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम (१२) अन्वये संयुक्त विभागीय चौकशी प्रस्तावीत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.